| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १२५ वा | गुरूवार दिनांक २३ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अल्पवयीन मुलीचा विवाह, ९ महिण्याची गरोदरपना उघडा पडला:गुन्हा दाखल

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत १६ वर्षीय ११ महिनेची मुलगी दि.०९.०७.२०२५ ते दि. १८.०७.२०२६ रोजी ही अल्पवयीन असताना देखील आई व सावत्र वडील यांनी तिचे एका गावातील एका तरुणा सोबत लग्न लावून दिल्याने नमुद तरुणानी तिचेशी शारिरीक संबध ठेवल्याने ती सध्या ९ महिण्याची गरोदर असल्याने ती सोनोग्राफीसाठी स्त्री रुगणालय धाराशिव येथे गेली असता ती अल्पवयीन असल्याबाबत वैद्यकीय अधिकारी यांनी एमएलसी द्वारे कळवल्याने पिडीतेने दि.२१.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-६४(२)(एफ), ६४(२)(एम), सह ७, १० बालविवाह प्रती अधिनियम २००६ सह कलम ४,८,१२ बा.लै.अ.सं. अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अन्न भेसळचे अधिकारी व कर्मचारी आहोत असे भासवुन लुटले

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गणेश रा. नवलगाव ता. भुम, शशिकांत संदीपानराव डोके, रा. गोलेगाव ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.२०.०७.२०२६ रोजी चिंचपुर फाटा येथे फिर्यादी नामे- जनार्धन शिवाजी मस्के, वय ३८ वर्षे, व्यवसाय दुध वाहतुक रा. वालवड ता. भुम जि. धाराशिव यांची गाडी नमुद गणेश यांनी आडवून आम्ही अन्न भेसळचे अधिकारी व कर्मचारी आहोत अशी तोतयेगीरी करुन दुधासह दोन कॅन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-जनार्धन मस्के यांनी दि.२१.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम २०४,३०३(२),१२६, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कार अपघातात एकाचा मृत्यू: गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत ज्ञानेश्वर व सोबत फिर्यादी शंकर राजु काळे, वय २६ वर्षे, रा. सारवाडी ता. जि. धाराशिव व मयत चक्रधर दत्ता कव्हळे हे तिघे दि.१४.०७.२०२६ रोजी कार मधून जात होते. दरम्यानकावलदरा येथील अनुराधा मंगल कार्यालयासमोर ज्ञानेश्वर यानी त्याचे ताब्यातील कार ही हायगईने व निष्काळजीपणे चालवून कार रस्त्याचे डिव्हायडरला धडक दिली. या अपघातात चक्रधर कव्हळे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर शंकर काळे हे किरकोळ व गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शंकर काळे यांनी दि.२१.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५ (ए)(बी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वेमार्गाला गती

## सर्वेक्षणाला मंजुरी; डीपीआरचे काम सुरु - आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्ह्यांना जोडणाऱ्या प्रस्तावित २४० किलोमीटर लांबीच्या नव्या रेल्वेमार्गाच्या उभारणीच्या दिशेने महत्त्वाची प्रगती झाली असून, या रेल्वेमार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालासाठी (डीपीआर) आवश्यक सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. तसेच प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे कामही सुरू झाले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

मराठवाड्यातील रेल्वे संपर्क अधिक सक्षम करण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. डीपीआर तयार झाल्यानंतर राज्य सरकारसह विविध संबंधित यंत्रणांशी आवश्यक समन्वय साधला जाईल. त्यानंतर नीती आयोग, केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि इतर सक्षम प्राधिकरणांकडून मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करून प्रकल्पाला अंतिम मान्यता देण्यात येणार आहे.

रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केल्याप्रमाणे, रेल्वे प्रकल्पांची मंजुरी ही विविध प्रशासकीय टप्प्यांतून पार पडणारी सातत्यपूर्ण प्रक्रिया असल्याने अंतिम मंजुरी व प्रत्यक्ष काम सुरू होण्याबाबत सध्या निश्चित कालमर्यादा सांगता येणार नाही. मात्र सर्वेक्षणाला मंजुरी मिळाल्याने हा प्रकल्प पुढील टप्प्यात पोहोचला असून, मराठवाड्याच्या विकासासाठी हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे आमदार पाटील यांनी नमूद केले.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या प्रकल्पासंदर्भातील माहिती दिली आहे. हा रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यानंतर धाराशिव, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील रेल्वे संपर्क अधिक मजबूत होणार असून, प्रवासी वाहतुकीबरोबरच कृषी व औद्योगिक मालवाहतुकीलाही मोठी चालना मिळेल. परिणामी मराठवाड्याच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

# डोली सुविधा बंद केल्यावरून तुळजाभवानी मंदिरात वाद!




तुळजापूर(प्रतिनिधी)- तुळजाभवानी मंदिरातील वृद्ध व दिव्यांग भाविकांसाठीची डोली सुविधा कोणतीही पूर्वसूचना न देता बंद केल्याच्या कारणावरून मंदिर संस्थानचे अधिकारी-कर्मचारी आणि विजय गंगणे यांच्यात वाद निर्माण झाला आहे. शिवीगाळ केल्याचा आरोप करत मंदिर संस्थानच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि. २१) काम बंद आंदोलन केले. याप्रकरणी विजय गंगणे याच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, शिवीगाळ केली नसून डोली सुविधा बंद का केली, एवढीच विचारणा केल्याचा खुलासा नगराध्यक्ष विनोद गंगणे यांचे बंधू विजय गंगणे यांनी केला आहे.

मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयासमोर अधिकारी- कर्मचाऱ्यांनी दिवसभर धरणे आंदोलन केले. संबंधितांवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. आंदोलनात कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून सहभाग नोंदवला. निवेदनात विजय गंगणे यांनी मंदिर संस्थानच्या जनसंपर्क अधिकारी, सहायक जनसंपर्क अधिकारी आणि सीईओ यांच्याशी अर्वाच्य भाषेत बोलून असंसदीय भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, मंगळवारी गर्दीच्या दिवशी कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याने मंदिराचे कामकाज काही काळ प्रभावित झाले. या प्रकरणी मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी अभिजीत तेरखेडकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोमवारी (दि. २०) विजय गंगणे यांच्याविरोधात तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार बालाजी कामतकर करीत आहेत.

# नळदुर्गमध्ये महाआरोग्य शिबीरात ७०० रुग्णांची तपासणी:मोहरम निमित्त

## पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशनचा उपक्रम; शिबिरात ६० जणांचे रक्तदान




नळदुर्ग (प्रतिनिधी)- नळदुर्ग पवित्र मोहरम महिन्याचे औचित्य साधून नळदुर्ग येथील पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने आयोजित महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ७०० रुग्णांची विविध आजारांसाठी तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले, तर रक्तदान शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले. नळदुर्ग येथील पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशन आणि सोलापूर येथील सिद्धेश्वर रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी नगराध्यक्ष शहबाज काझी यांच्या मार्गदर्शनाखाली १५ जुलै रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तुळजापूर येथील पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार मनीषा कोळगे यांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नळदुर्गचे अपर तहसीलदार प्रमोद गायकवाड, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, नगरसेवक इमाम शेख, तानाजी जाधव, शशिकांत पुदाले, रिजवान काजी, हाजी अब्दुल गफूर कुरेशी, माजी नगराध्यक्ष मुश्ताक कुरेशी, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. सुरेंद्र मडके, आलेम मोहम्मद रजा, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद कांगूणे, प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, उपप्राचार्य अशोक कदम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

उदघाटनानंतर पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष शहबाज काझी यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शिबिर यशस्वी करण्यासाठी शहबाज काझी यांच्या मार्गदर्शनाखाली पांचपीर स्पोर्ट्स असोसिएशनच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. आरोग्य शिबीरात या तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी या आरोग्य शिबिरात मूत्रपिंड, मूत्ररोग, स्त्रीरोग, हृदयरोग, मधुमेह, थायरॉईड, सर्दी-खोकला, मेंदूरोग आणि अस्थिरोग आदी आजारांवर सोलापूर येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली.

मेंदूरोग तज्ज्ञ डॉ. एलियास बेग, मूत्रपिंड रोगतज्ज्ञ डॉ. मोहम्मद साजिद, डॉ. सुहेल शेख, डॉ. वाहिद शेख, डॉ. समीर शेख, डॉ. हसीना शेख, डॉ. निहारीका रघोजी-पिलगुलवार, डॉ. नूर बानू शेख, डॉ. सना शेख व डॉ. पवार यांनी रुग्णांची तपासणी केली.

# आपत्कालीन प्रसंगी, मदतीसाठी डायल करा '११२'

## पोलीस अधीक्षक ऋतु खोखर यांचे आवाहन




धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी 'डायल ११२' या एकात्मिक आपत्कालीन सेवा क्रमांकाचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन धाराशिव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती ऋतु खोखर यांनी केले आहे.

गुन्हा, रस्ते अपघात, महिलांवरील व बालकांवरील अत्याचार, संशयास्पद हालचाली, घरगुती हिंसाचार, वैद्यकीय आणीबाणी किंवा अग्निशमनाची आवश्यकता भासल्यास कोणताही विलंब न करता ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

'डायल ११२' सेवेमुळे संबंधित यंत्रणांना घटनेची माहिती तात्काळ मिळून पोलीस, रुग्णवाहिका आणि अग्निशमन विभागाकडून जलद प्रतिसाद दिला जातो. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही आपत्कालीन घटना लपवून न ठेवता त्वरित प्रशासनाला कळवावी, असेही पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी सांगितले आहे.

# खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या वाढदिवसा निमित्त शेतकऱ्यांना फवारणी पंपाचे वाटप




धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- जिल्ह्याचे शिवसेनेचे लोकप्रिय खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जळकोट जिल्हा परिषद गटाचे सदस्य पती गोपाळ भैया सुरवसे यांच्याकडून जळकोट व परिसरातील शेतकरी बांधवांना विशेष सवलतीच्या दरात औषधी फवारणी बॅटरी १५०० पंपाचे वाटप जळकोट येथे करण्यात आले. यावेळी जळकोट व परिसरातील मुरटा, होर्टी, मानमोडी, जळकोट वाडी, हंगरगा नळ , चिकुंद्रा, मानेवाडी, हगलूर येथील सर्व शेतकरी बांधवांनी त्याचा लाभ घेतला या कार्यक्रमास तुळजापूरचे शिवसेना नेते ऋषी भैय्या मगर, जळकोट जिल्हा परिषद सदस्य पती गोपाळ भैया सुरवसे, माजी सरपंच तमन्नपा माळगे, प्रसाद हतै, आनंद सावंत, डिगंबर सुरवसे, पांडुरंग कदम , ओंकार सोनटक्के, बाळासाहेब पाटील, पत्रकार विजय पिसे, विश्वास भोगे, चंद्रकांत स्वामी सर, सेनापती पाटील,पिंटू हासुरे, नागेश स्वामी, रोहित कदम, चेतन सोनटक्के, अमरसिंग खारे, सचिन सुरवसे, रुक्मुद्दीन तांबोळी, प्रकाश कदम, इमराण बागवान व जळकोट गावातील महिला शेतकरी व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भगवानबाबांच्या पालखीने परंडा दुमदुमले:

## हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत जल्लोषात स्वागत

परंडा (प्रतिनिधी)-श्रीक्षेत्र भगवानगड येथील संत भगवानबाबा महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे सोमवारी सकाळी ११ वाजता परंडा शहरात उत्साहात आगमन झाले. कल्याणसागर माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात पालखीचे स्वागत भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी कुटुंबीयांसह केले. यावेळी वारकरी, नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.पालखीचे स्वागत शैला ठाकूर, उपनगराध्यक्ष समरजितसिंह ठाकूर, सुबोधसिंह ठाकूर, नगरसेवक अविनाश विधाते, रमेशसिंह परदेशी, महावीर काशीद, सुखदेव टोंपे आदींसह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. भगवानबाबा महाराजांच्या पालखी सोहळ्याचे हे १०९ वे वर्ष असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही पालखी परंडा शहरातील कल्याणसागर विद्यालयाच्या प्रांगणात विसाव्यासाठी थांबली. हजारो वारकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. डॉ. न्यायाचार्य नामदेव शास्त्री महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भगवानगडाचे चतुर्थ उत्तराधिकारी कृष्णा महाराज शास्त्री, भगवान महाराज शास्त्री, राजपूत महाराज, अतुल महाराज शास्त्री व संतोष महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करीत आहे.

सुमारे २५ हजार वारकरी या पालखी सोहळ्यात सहभागी झाले असून, त्यांच्या सेवेसाठी पिण्याच्या पाण्याचे पाच टँकर, १५ वाहने, दोन जीप, चार रुग्णवाहिका व आरोग्य पथकाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# लग्न कर नाही तर तुझे आई वडीलांना जिवे मारुन टाकीन,अशी धमकी देवुन केला लैंगिक अत्याचार

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत १७ वर्षीय ५ महिनेची मुलगी दि.०९.१२.२०२५ रोजी०८.३० ते १२.३० वा. सु. ते दि. १९.०७.२०२६ रोजी १६.०० वा. सु. हिस तरुणानी तु माझ्या सोबत लग्न कर नाही तर तुझे आई वडीलांना जिवे मारुन टाकीन अशी धमकी देवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. व आपल्यात झालेल्या संबंधाचे छायाचित्रीकरण वायरल करेन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२०.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-६४(२)(एम), ७४,३५१(२) सह ४, ८, १२ बा.लै.अ.सं. अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राजीनामा दिल्यास प्रश्नाची सोडवणुक होते का?

दिल्लीत लोकसभेचे अधिवेशन चालू असताना कॉक्रोचपक्षाने केलेले आंदोलन व त्याला साथ देणारे देशातील विरोधीपक्षाची साथ ही योग्य आहे का? याचा विचार केला पाहिजे. वास्तविक पेपरलिक होणे किंवा करणे योग्य नाही, याचे समर्थन कोणीही करणार नाही. यापुर्वीच्या सरकारमध्येही अशी घटना घडली आहे. पहिल्यांदा अशी घटना घडली असेही नाही. वास्तविक याचे कोणीही समर्थनही करणार नाही नये. त्याच प्रमाणे केंद्र सरकारचा यात प्रत्यक्ष संबंध असतोच असे नाही. परिक्षा ही एक प्रकिया आहे. परिक्षामंडळ एक समिती नेमलेली असते. अध्यक्ष असतात. अनेक सदस्य, विचारवंत, अभ्यासू तसेच जाणकार मंडळी या प्रक्रियेत असतात. मंत्री त्यांच्यावर नियंत्रण ठेवतात. परिक्षा ही एक प्रकिया ती ज्यांच्यावर जबाबदारी दिलेली असते त्यांनी पार पाडावी लागते. पेपल लिक होणे याला जबाबदार सर्वस्वी मंत्र्यास धरणे योग्य नाही. तरी मनात आकसपना ठेवून आंदोलने केली जातात. मुळात दिल्लीतील आंदोलन केले. पोलिसांनी बळाचा वापर केला. वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केले. दिपके यांनी युवकांना आवाहन केले. असे असताना हा खेळ पुर्वनियोजित तर नाही ना! अशी शंका येते, मुळात चीनचे हस्तगत यात समावले आहे का अशी शंका निर्माण होते. या बाबत सरकारने आपली जबाबदारी पुर्ण करीत असताना ती परिक्षा प्रक्रियते खुद्दार नसलेली मंडळींनी केलेले काम आहे. त्यांना सोडून दिले नाही. चौकशी समिती नेमली व तातडीने जेलमध्ये टाकण्यात आले आहे. आज पेपरलिक प्रकरणी चुकीचे काम केल्याप्रकरणी संशयित जेलची हवा खात आहेत. त्यांना सोडले नाही. अनेक प्रांतातून पकडून जेलमध्ये टाकले आहे. यात दिरंगाई केली नाही. याची चौकशी चालू असताना केवळ धर्मेंद्र प्रधानाचा राजीनामा मागणीसाठी तिव्र आंदोलन केले जात आहे. पंतप्रधानाच्या घरासमोर उपोषण केली. वास्तविक काँग्रेसपक्षाने आयत्या चालू असलेल्या आंदोलनात सहभाग घेतला व आंदोलन केले. यापेक्षा काँग्रेसने स्वतंत्र आंदोलन करणे अपेक्षित होते. काँग्रेस पक्षाची देशातील स्थिती बिकट आहे. जनतेचा पाठींबा नाही. अनेक राज्य काँग्रेसमुक्त झाली आहेत. दुसऱ्याच्या आंदोलनात सहभागी होवुन अधिवेशन काळात हिंसक वळण लावण्याचा प्रयत्न करणे अयोग्य आहे. मुळात कॉक्रोच पक्षाचे साथीदार अधिक तर बांगला देशी व पाकिस्तानी आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. वास्तविक जे विद्यार्थी अभ्यासाला समोरे जातात, हुशार आहेत ते अनेकदा परिक्षेला समोरे जातात. दुर्दैवाने नीटापेपर लिक झाला हे दुर्दैव आहे. पुन्हा परिक्षा झाली त्यात अनेकांना मोठे यश मिळविता आले आहे. वास्तविक या समस्याबाबत सरकार विचार करीत आहे. मार्गशोधत आहे. लोकसभेच्या चालू अधिवेशनात चर्चा होणार यात शंका नाही. दुसरा कोणातही विषय असला तरी चालला असता मात्र पेपर लिक प्रकरणी विद्यमान केंद्रातील सरकार अस्थिर करणे हा डाव असेल व देशविरोधी लोकांची साथ असेल तर ते योग्य नाही. यात संहभाग तज्ज्ञांचा नाही तर ठरविक मंडळीकोणतेही देशासाठी काम केलेले दिसून येत नाहीत. जे भ्रष्टाचारात आडकलेले होते. देशावरील संकट काळात मदत केलेली मंडळी, या आंदोलनात दिसत असेल तर हे आंदोलन देश विरोधी आहे हे सहज लक्षात येते. अनेकजन आंदोलनकर्त्याच्या विरोधात बोलत आहेत. मेलेली मडे उकरून काढून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा हा डाव असल्याचे आता जनताच बोलत आहे. जनतेला आंदोलनाची दिशा व या मागील उद्देश काळाला आहे. त्यामुळे आंदोलन यशस्वी होणार नाही. केजरीवाल हे गैरप्रकारमुळे मुख्यमंत्रीपदावरून पाय उतार व्हावे लागले. त्याच प्रमाणे राहुल गांधी यांनी देशा बाबत असे कोणते काम केले ज्यामुळे देशातील जनतनेचा स्वाभिमान जागृत होईल, मान उंचावेल. राहुल गांधी एकमेव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिव्या घालणे व अपशब्द बोलणे हा एकमेक कार्यक्रम हाती घेतल्याचे जनतेनी ओळखले आहे. त्यामुळे काँग्रेसचे आंदोलन ठिकठिकाणी होत असले तरी त्यात सहभाग कोणाचा आहे हे पहिल्यास, अनेक बाबी कळून येतील. काँग्रेसने आपली प्रतिमा उज्वल करण्याचा प्रयत्न करावा. दुसऱ्याच्या आंदोलनात आपली पोळी भाजण्याचा दुर्दैवी प्रयत्न न केलेला बरा. त्यामुळे दिल्लीतील आंदोलनाची धार कमी होत आहे. आंदोलनकर्त्यास चुकीची माहिती देवून बोलावले आहे. नेतेमंडळी पळून गेली व निष्पात विद्यार्थी यात बळी पडल्याचे दिसून येत आहेत. सरकार चर्चेस तयार आहे. केवळ शिक्षण मंत्र्याचा राजीनामा मागणे किंवा घेणे हा लिक पेपर प्रकरणी उपाय नाही. राजीनामा दिला म्हणजे समस्या सुटली असे होत नाही. देशात अनेक यापुर्वी घटना घडल्या आहेत. त्यावेळी राजीनामा दिला किंवा घेतला असे क्वचीत घडले आहे. त्यामुळे देशात जे काही चालले आहे ते ठरवुन चालले आहे. केंद्र सरकार अस्थिर करण्याचा हा डाव आहे. देशात ठराविक देशविरोधी काम करणारी मंडळीचा सहभाग आंदोनात दिसत असतील तर ते योग्य नाही. या आंदोलनास परकिय शक्ती व परदेशातून निधी येत असेल व त्याचा वापर आंदोलनास होत असेल तर या देशाचे दुदैव म्हणावे लागेल. त्याच प्रमाणे देशात एक अशी विरोधी शक्ती कार्यरत आहे ती देशातील अंतर्गत स्थिती खिळखिळी करण्याचा प्रयत्न चालू आहे हे जनतेनी रोखले पाहिजे. जतनेनी आता गाफील न राहाता देशविरोधी काम करण्यावर लक्ष ठेवले पाहिजे. यात ठराविकांचा समावेश आहे हे लक्षात घेतले पाहिजे. देशात आज पर्यंत यापुर्वीच्या सरकारच्या काळात अनेक चुकीच्याबाबी चालत आल्या. तसेच या मोदी सरकारमध्ये चालत नाहीत. परदेशातून मोठ्या प्रमाणता फंडींग येत होता तो रोखला गेला. परदेशातून येणाऱ्या पैशातून देशात अस्थिरता माजविणे, धर्मांतर सारखा प्रकारात वाढ झालेली होती ती कांही प्रमाणात रोखली गेली. याचा परिणाम देशात भाडोत्री आंदोलनकर्ते आणले जात आहेत. अस्थिरता माजविली जात आहे ते रोखलेही जात आहेत. काही उघडे पडले जात आहेत. त्यामुळे आता देशातील दिल्ली आंदोलनामुळे जागृतता निर्माण झाली आहे. अधिकतर जनता आंदोलनकर्त्यांना पाठींबा देत नाही. चुकीच्या मार्गाने देशविरोधी आंदोलने यापुर्वीही यशस्वी झाले नाहीत, याही वेळस होणार नाहीत हे उघड आहे.

# भक्तीचा सुवर्णयोग : संत शिरोमणी नरहरी महाराजांचे विठ्ठल प्रेम आणि कोर्टी येथील ऐतिहासिक संकल्प



संत शिरोमणी नरहरी सोनार

पंढरीची वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव आहे. ज्ञानोबा तुकोबा पासून ते चोखोबा, सावता माळी, गोरोबा कुंभार अशा अनेक संतांच्या जयघोषाने पंढरपूर दुमदुमून जाते. या सर्व माळेतील एक अत्यंत लख्ख आणि दैदीप्यमान रत्न म्हणजे संत शिरोमणी नरहरी महाराज. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराजवळच त्यांची समाधी आहे. विठ्ठलाच्या दर्शनाला जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याचे पाऊल या समाधीपाशी आपसूकच वंदनासाठी थांबते. मात्र दुर्दैवाने आजच्या विविध दैनिकामधून आणि विशेष पुरवण्यामधून संत नरहरी महाराज, त्यांचे माता - पिता आणि त्यांच्या परिवाराच्या योगदानाविषयी फारसे लिहिले जात नाही. हा इतिहास नवतरुण पिढीपर्यंत पोहोचणे काळाची गरज आहे.

**शिवभक्तीकडून विठ्ठल चरणी...**

संत नरहरी महाराज हे मूळचे देवगिरीचे ( दौलताबाद ) पण नंतर ते पंढरपूरात स्थायिक झाले. व्यवसायाने सोनार सुवर्णकार असलेले नरहरी महाराज हे सुरुवातीला कट्टर शिवभक्त होते.ते विठ्ठलाच्या मूर्तिकडे पाहतही नसत.मात्र एकदा एका सावकाराने विठ्ठल मूर्तीसाठी करदोडा बनवण्याचे काम त्यांना दिले. मूर्तिचे मोजमाप घेण्यासाठी जेंव्हा डोळ्यावर पट्टी बांधून नरहरी महाराज विठ्ठल मूर्तिजवळ गेले, तेंव्हा स्पर्श करताच त्यांना मूर्तिमध्ये कधी शिव तर कधी विष्णूचा भास झाला. हरि आणि हर ( शिव आणि विष्णू ) एकच आहेत. हा अद्वैताचा साक्षात्कार त्यांना झाला आणि ते विठ्ठल चरणी लीन झाले. त्यांनी आपल्या कलेलाच भक्तीचे माध्यम बनवले.-

देवा तुझा मी सोनार । नामाचा व्यवहार ।।

**विस्मरणात गेलेला परिवार :कोर्टी येथील पवित्र वास्तूचा होणार जीर्णोद्धार.**

संत नरहरी महाराज केवळ एका रात्रीत संत झाले नाहीत. तर त्यांच्यावर झालेले कौटुंबिक संस्कार तितकेच उच्च होते. त्यांच्या माता पित्यानी त्यांच्यामध्ये प्रामाणिकपणा आणि कलेप्रती निष्ठा याचे बाळकडू पाजले होते. त्यांच्या या भक्तीच्या प्रवासात त्यांची माता सावित्रीबाई आणि पिता अच्युतबाबा आणि बंधू नारायण स्वामी यांचे मोलाचे योगदान होते. पंढरपूर जवळील कोर्टी येथे त्यांच्या माता पिता आणि बंधूचे समाधीस्थान आहे. आनंदाची बाब म्हणजे, या विस्मरणात गेलेल्या पवित्र स्थानाच्या जीर्णोद्धाराचे शिवधनुष्य सोलापूर सोनार समाज संस्थेने उचलले आहे.सोलापूर सोनार समाज संस्था तालुका शाखा पंढरपूर चे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता श्री. आनंद रोपळकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा संकल्प सोडण्यात आला आहे. स्थानिक ग्रामपंचायत कोर्टीन, श्री. संत नरहरी महाराज समाधी मंदिर समिती आणि समाजातील दानशूर समाज बांधवांच्या आर्थिक व भौतिक मदतीने हा जीर्णोद्धाराचा ऐतिहासिक सोहळा लवकरच सुरु होत आहे. संतांच्या मागे उभा राहणारा त्यांचा परिवार आणि त्यांच्या स्मृती जपणारा हा समाज खरोखरच वंदनीय आहे.

**महाद्वाराजवळील समाधी : एक जागृत स्थान**

पंढरपूर च्या मुख्य मंदिराच्या महाद्वाराजवळच संत नरहरी महाराजांचे समाधी मंदिर आहे. वारीच्या काळात लाखो वारकरी या समाधीचे दर्शन घेतात. कठीण कर्म उदंड केले, तेंव्हा नरहरी पद पावले . अशा शब्दात संतांनी त्यांचा गौरव केला आहे. १३ व्या शतकात ( शके १२३५, माघ वध्य तृतीया ) त्यांनी पंढरपूरात समाधी घेतली. आज आषाढी वारीच्या निमित्ताने सर्व संतावर विशेष लेख लिहिले जात असतात. संपूर्ण महाराष्ट्राला अद्वैताचा संदेश देणाऱ्या संत नरहरी महाराजांच्या कौटुंबिक आणि आध्यात्मिक इतिहासाला दैनिकांनी प्रमुख स्थान दिले पाहिजे.

**समाधी मंदिराचे व्यवस्थापन आणि संपर्क.**

पंढरपूर येथील मुख्य महाद्वाराजवळील श्री. संत नरहरी महाराज समाधी मंदिराची व्यवस्था आणि वारी दरम्यानचे नियोजन,'श्री. संत नरहरी महाराज समाधी मंदिर समिती मार्फत अतिशय उत्तम रीतीने पाहिले जाते. समितीचे अध्यक्ष मा. श्री. आनंदराव उर्फ नंदुशेठ पालकर कराड, उपाध्यक्ष मोहन मंद्रूपकर सोलापूर, कार्यवाह संजय आष्टीकर, खजिनदार सुरेश पंडित कोल्हापूर, जेष्ठ विश्वस्त भारतशेठ कारीकर सोलापूर, सुभाष वेदपाठक मोडनिंब आणि इतर सर्व सन्माननीय विश्वस्त मंदिराच्या विकासासाठी कटीबद्ध आहेत. विशेष म्हणजे समितीचे कार्यवाह श्री. संजयजी आष्टीकर हे अवघ्या १५ किलोमीटर अंतरावर स्थानिक पातळीवर राहत असून दररोज महाराजांच्या सेवेसाठी आणि दर्शनासाठी मंदिरात उपस्थित असतात. भाविकांना मंदिराविषयीं माहिती मिळवण्यासाठी, वारी दरम्यान विविध सेवा कार्यात किंवा अन्नदानात सहभाग घेण्यासाठी अथवा संपर्क साधण्यासाठी कार्यवाह श्री. संजयजी आष्टीकर यांच्याशी खालील क्रमांकावर थेट संपर्क किंवा व्हाट्सअप करता येईल.- ९९२१४ ३०१४९ व व्यवस्थिपक श्री. धनाजी देटे सर ९८९०३ २३८३३.

संत शिरोमणी नरहरी महाराज की जय !.

**---- वसंत पोतदार अध्यक्ष --**
**सोनार समाज संस्था, सोलापूर**
**मोबाईल ९४२३० ६५९१५**

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना विधानभवनात अभिवादन



मुंबई/प्रतिनिधी: दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आज विधानभवन येथे त्यांच्या प्रतिमेस विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

आमदार शिवाजीराव गर्जे, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, सचिव-४ शिवदर्शन साठ्ये, सहसचिव राजेश तारवी, उपसचिव विजय कोमटवार, (संचालक, वि.स.पागे), संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; सुधारणांमुळे वाढली व्याप्ती

शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळात केलेल्या भाषणा दरम्यान या योजनेत आणखी काही महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केल्या. यामुळे योजनेची व्याप्ती वाढल्याने शेतकरी सुखावला आहे. ही व्याप्ती वाढल्यामुळे लाभ होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढणार आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' या योजनेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देऊन कर्जमुक्ती देत असतांनाच ग्रामिण अर्थकारणाला गती मिळणार आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चातील वाढ, शेतमालाला मिळणाऱ्या भावातील अनिश्चितता यामुळे उत्पादन व खर्च याचा ताळमेळ न झाल्याने शेती व्यवसायाचे आर्थिक गणित बिघडते. परिणामी शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतो. अशा परिस्थितीत कर्जमुक्ती योजनेमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

या योजनेमुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ होणार आहे, हे सर्वश्रृत आहेच. या योजनेत केलेल्या सुधारणांमुळे योजनेतील काही अटी शिथिल करून अधिक शेतकरी या योजनेचा लाभ घेणास पात्र ठरणार आहेत.

**काय केल्या सुधारणा**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या घोषणेनुसार, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत पूर्वी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपये लाभाची मर्यादा ही अट रद्द करण्यात आली. आता या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.

पुर्वीच्या सुचनेनुसार दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांना दोन लाखांपेक्षा जादा रक्कम भरण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असली, तरी त्यातील दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार आहे.

**योजनेची अंमलबजावणी**

या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, खासगी बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्या मार्फत होत आहे. बँकांकडील पीक कर्जखात्यांच्या माहितीच्या आधारे पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित झाली आहे.

**कृषी क्षेत्रासाठी भरीव निधी**

शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देतांनाच शेतीचा वाढता खर्च, वीज, सिंचन, हमीभाव, बाजारपेठ आणि नैसर्गिक संकटे याची जाणीव ठेवून राज्य शासन कृषी क्षेत्रावर दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. त्यातच साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या वीजपंपांचे ४८ हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल माफ करणार असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खुप मोठा दिलासा मिळाला आहे.

**कर्जमुक्ती ते कृषीक्षेत्राची भरारी**

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' या योजनेमुळे शेतकऱ्यांना आत्मविश्वास देणे हे सुद्धा एक महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. त्यामुळे कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, हा या योजनेमागील व्यापक दृष्टिकोन आहे.

शेतकरी हित जोपासणारे राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शाहू महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ध्येयधोरणांचा अवलंब विद्यमान शासन करतांना दिसत असून शेतकऱ्यांची समृद्धी हेच शासनाचे उद्दिष्ट असल्याचे शासनाने अधोरेखीत केले आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर**

# ग्रामोद्योग भरारी पुरस्कार-२०२६ साठी २८ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/(जिमाका):** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने शासकीय योजनांच्या माध्यमातून विशेषतः ग्रामीण भागात यशस्वी उद्योग उभारणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणाऱ्यांचा यशोचित सन्मान करण्यासाठी 'ग्रामोद्योग भरारी पुरस्कार-२०२६' देण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी इच्छुकांनी २८ जुलै २०२६ पूर्वी आपले अर्ज सादर करावेत असे आवाहन लातूर येथील जिल्हा ग्रामोद्योग कार्यालयाद्वारे करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार योजनेचे हे चौथे वर्ष असून, यात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारांसोबतच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या काही उद्योजकांना उत्तेजनार्थ पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. मंडळाच्या विविध योजनांतर्गत अर्थसहाय्य घेऊन यशस्वीरीत्या उद्योग सुरू केलेल्या उद्योजकांकडून १३ जुलै २०२६ पासून अर्ज मागविण्यात येत असून, याचे नामांकन अर्ज मंडळाच्या ु. ीिर्ड्डीिंळल.ीस या अधिकृत संकेतस्थळावर तसेच खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहेत. भरलेले अर्ज २८ जुलै २०२६ पूर्वी जिल्हा कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक असून, अधिक माहितीसाठी इच्छुक उद्योजकांनी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय (जिल्हा उद्योग केंद्र द्वारा), एम.आय.डी.सी. एरिया, लातूर येथे किंवा ०२३८२-२२०१४४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# सांघिक भावनेचा विजय




स्पेनने देशात फुटबॉल संस्कृती रुजविण्यासाठी कायम प्रयत्न केले. तेथील फुटबॉल क्लब्ज केवळ फुटबॉलपटू नव्हे, तर योग्य मार्गदर्शकही तयार करतात. व्यक्तिकेंद्रित भावनांपेक्षा संघ महत्त्वाचा, हे तेथे रुजवले गेले आहे.

न्यूयॉर्कचे न्यू जर्सी स्टेडियम एका मंतरलेल्या युगाच्या अखेरीला साक्ष ठरले. दुसर्यांदा विश्वचषक जिंकण्याचे लिओनेल मेस्सीचे स्वप्न भंगले. तरीही फुटबॉलप्रेमींच्या अवघ्या विश्वावर मेस्सीची जादू कायम राहणार आहे. सलग दुसर्यांदा स्पेनने फिफा विश्वचषकावर आपले नाव कोरले. स्पेनची बचावाची भिंत अर्जेंटिनाला भेदता आली नाही. फूटबॉल हा सांघिक खेळ आहे. याचे जितेजागते उदाहरण स्पेनने फिफा विश्वचषकाच्या महामुकाबल्यात दाखवून दिले. संघातील ठराविक खेळाडूच्या बळावर फूटबॉल सामना जिंकता येत नाही, त्यासाठी संघाने एकदिलाने खेळावे लागते. स्पेनने ते करून दाखवले. ही सांघिक भावना एवढी प्रबळ होती, की सामना जवळपास एकतर्फी ठरला. लिओनेल मेस्सी हतबल ठरला याचे कारण देखील स्पेनची संघभावना.

स्पेनकडे वलयांकित लामिन यामालसारखा खेळाडू होता. पुढच्या काळातील मेस्सी, हीच फुटबॉलप्रेमींची यामालबद्दल भावना आहे. तो अवघ्या एकोणीस वर्षांचा असून त्यामुळेच स्पेनसाठी तो सर्वांत मोठे बलस्थान ठरणार आहे. रोनाल्डो, एम्बाप्पे यांच्याशी त्याची तुलना होते. अंतिम सामन्यात मिडफील्डमधून कर्णधार रोड्रीने खेळावर ठेवलेले नियंत्रण कौतुकास्पद होते.

गोलरक्षक उनाई सिमॉनची कामगिरी अतिशय लक्षवेधक ठरली. संपूर्ण स्पर्धेत त्याच्याविरुद्ध केवळ एकच गोल झाला. गोल्डन ग्लोव्ह पुरस्काराने त्याला गौरविण्यात आले आहे. सामन्याच्या नव्वद मिनिटांमध्ये स्पेनच्या भक्कम बचावासमोर अर्जेंटिनाच्या एकाही खेळाडूला यश मिळाले नाही.

खिलाडू वृत्तीचा अभाव

सामना जादा वेळेत गेल्यावर फेरान टोरेसच्या गोलमुळे विश्वचषक जिंकण्याच्या अर्जेंटिनाच्या आशा धुळीला मिळाल्या. ज्या दोन संधी मिळाल्या त्याचा अर्जेंटिनाला उपयोग करता आला नाही. उपविजेतेपदावर अर्जेंटिनाला समाधान मानावे लागले. याआधी २०१४ मध्ये देखील अर्जेंटिनाला उपविजेतेपद मिळाले. २०२२ मधील यशाने अर्जेंटिनाच्या आशा पल्लवित झाल्या होत्या; पण हरणे किंवा जिंकणे यापेक्षा खिलाडूवृत्ती मोठी, या तत्त्वाला हरताळ फासणारीच अर्जेंटिनाच्या संघाची मानसिकता होती. ती फुटबॉल संस्कृती नव्हे ! ज्या शिस्तीच्या बळावर आधीचा विश्वचषक जिंकला त्याचा मागमूस यावेळी अर्जेंटिनाकडे दिसला नाही. यश मिळाल्यावर त्याचा उन्माद कायम राखणे शिखरावरून घरंगळत नेणारे ठरते. १९८६ मध्ये दिएगो मॅराडोनाच्या नेतृत्वाखाली विश्वचषक जिंकल्यावर पुढच्याच स्पर्धेत अर्जेंटिनाच्या संघाने शिस्त गुंडाळून ठेवून पराभवाला आपणहून निमंत्रण दिले. यावेळी त्याचीच पुनरावृत्ती झाली, असे म्हणावे लागेल. खिलाडूवृत्तीचा अभाव हे अर्जेंटिनाच्या फुटबॉल संघाचे वैशिष्ट्य बनले आहे.

खिलाडू भावनेपासून हा संघ किती दूर गेला आहे याचे प्रत्यंतर स्पेनच्या विजयानंतर लागलीच आले. अर्जेंटिनाच्या खेळाडूंनी पराभव सहन न होऊन स्पेनच्या खेळाडूंना धक्काबुक्की केली. यातून स्पर्धेला लागलेले गालबोट लवकर विसरले जाणार नाही. सामना गमावल्यावर, विश्वचषकाचे स्वप्न भंगल्यावर मेस्सी भावुक होणे स्वाभाविक होते. त्याच्या कोट्यवधी चाहत्यांसाठी तो चटका लावणारा क्षण ठरला. सामना जेथे झाला ते मेटलाइफ स्टेडियम मेस्सीसाठी यावेळीदेखील दुर्दैवी ठरले, हा वेगळा योग म्हणावा लागेल. दहा वर्षांपूर्वी कोपा अमेरिका स्पर्धेतील अपयशानंतर मेस्सी एवढा निराश झाला होता, की त्याने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून तडकाफडकी निवृत्ती जाहीर केली होती. त्याचे चाहते आणि फुटबॉलचेही सुदैव म्हणून त्याने निवृत्तीचा निर्णय मागे घेतला. आता तसे होणार नाही, याची त्याच्या चाहत्यांना जाणीव आहे. कायम शिखरावर राहणे कोणालाच शक्य नसते. मेस्सीला त्या वास्तवाला सामोरे जावे लागले आहे. सामना गमावल्यावर अर्जेंटिनाच्या संघाचे प्रशिक्षक लिओने स्कोलोनी यांच्यासह अनेकांना अनावर झालेले अश्रु मेस्सीसाठी होते. इंग्लंड, अर्जेंटिना, पोर्तुगाल, फ्रान्स, जर्मनी यापैकी एक संघ विश्वविजेता ठरेल, अशी अटकळ बांधली जात असताना स्पेनने ला मार्चा रेयाल, अर्थात शाही संचलन हे त्याच्या राष्ट्रगीतातील शब्द खरे करून दाखवले.

# मेथी, जिरे आणि ओवा एकत्र खा आणि या समस्यांना पळून लावा



स्वयंपाक घरातील मसाल्याच्या भांड्यात मेथी, जिरे आणि ओवा हे मसाले हमखास असतात. कारण या मसाल्यांमुळे जेवणाची चव वाढण्यास मदत होते. विशेष म्हणजे हे जेवढी जेवणाची चढ वाढवतात तेवढेच हे आरोग्यासाठी देखील उत्तम असतात. त्यामुळे याचा आहारात हमखास वापर केला जातो. मात्र, हेच मसाल्याचे तीनही प्रकार एकत्र खाल्यास अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. चला तर जाणून घेऊया हे तीनही जिन्नस एकत्र खाल्लाने कोणकोणत्या समस्या दूर होण्यास मदत होते.

गॅस कमी होतो

मेथी, ओवा आणि जिरे फ्लेव्होनॉइड अँटीऑक्सिडंट्स सारख्या दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध असतात. यामध्ये असलेले अँटिऑक्सिडंट शरीरातील जळजळ कमी करण्यासाठी प्रभावी ठरू शकतात. याशिवाय, हा एक चांगला दाहक-विरोधी एजंट आहे जो शरीराची जळजळ कमी करू शकतो. या तिन्हींच्या मिश्रणाने पोटातील गॅस आणि ॲसिडिटीपासून आराम मिळू शकतो.

एक्झामाची लक्षणे कमी होतात

एटोपिक डर्माटायटीस किंवा एक्जिमा ही अशी स्थिती आहे ज्यामुळे त्वचेवर पुरळ आणि जळजळ होते. याशिवाय एक्जिमामुळे जळजळ, खाज सुटणे, त्वचेला भेगा पडणे, खडबडीत त्वचा होणे. या सर्व समस्यांमध्ये मेथी जिरे आणि ओवा दाणे तुमच्यासाठी प्रभावी ठरू शकतात. यामध्ये असलेले गुणधर्म एक्जिमापासून आराम देऊ शकतात.

त्वचेवरील पांढरे डाग

मेथी, ओवा आणि जिरे यांच्या मिश्रणाने तयार केलेली पेस्ट लावल्यास त्वचेवरील पांढरे डाग किंवा ल्युकोडर्मा ग्रस्त भागांपासून आराम मिळू शकतो.

वजन कमी करण्यात प्रभावी

मेथी, ओवा आणि जिरे यांचे मिश्रण आपल्या शरीरातील चयापचय गती वाढवू शकते. हे मिश्रण आपल्या शरीरातील अतिरिक्त चरबी जाळण्यास मदत करते. तुमच्या दैनंदिन जीवनात या मिश्रणाचा नियमित समावेश करून तुम्ही वाढत्या शरीराचे वजन नियंत्रित करू शकता. तसेच, यामुळे शरीराची वाढती जळजळ कमी होऊ शकते.

मधुमेहावर होते नियंत्रण

मेथी, ओवा आणि जिरे यांचे मिश्रण शरीरातील इन्सुलिनची पातळी नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त ठरू शकते. यात मधुमेहविरोधी गुणधर्म आहेत. ज्यामुळे शरीरातील इन्सुलिनची पातळी कमी होऊ शकते. याच्या मदतीने तुम्ही मधुमेहाच्या समस्यांवर नियंत्रण ठेवू शकता.

खाज सुटणे

मेथी, ओवा आणि जिऱ्यामध्ये जंतुनाशक गुणधर्म असतात. जे तुम्हाला खाजेवर फायदेशीर ठरू शकतात. हे तुमच्या त्वचेवर होणार्या अनेक प्रकारच्या जीवाणू आणि संसर्गाच्या समस्यांपासून आराम देऊ शकते. त्याच वेळी, अंतर्गत समस्या कमी करण्यासाठी, तुम्ही हे मिश्रण पाण्यात घालून पिऊ शकता. यातून तुम्हाला खूप फायदा होईल. मेथी, जिरे आणि अजवाईन शरीरातील समस्या कमी करू शकतात. परंतु, लक्षात ठेवा की जर तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच या मिश्रणाचे सेवन करा.

# तणाव आणि चिंता दूर करण्यासाठी ध्यान

कर,मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी प्रभावी



आधुनिक जीवनशैलीमुळे तणाव आणि चिंता या समस्या सामान्य होत आहेत. रोजच्या जीवनातील दगदगी, जबाबदाऱ्या, आर्थिक अडचणी आणि स्पर्धात्मक वातावरण यामुळे मनावर दडपण येते. अशा परिस्थितीत ध्यान, किंवा मेडिटेशन, हा एक प्रभावी उपाय ठरतो. प्राचीन काळापासून ध्यानाला मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी उपयुक्त मानले जाते. दररोज ध्यान केल्यास तणाव, चिंता, आणि इतर मानसिक विकारांवर नियंत्रण मिळवता येते. ध्यान म्हणजे काय? ध्यान म्हणजे स्वतःला एका ठिकाणी केंद्रित करून आपल्या विचारांवर आणि भावनांवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया. ध्यानाचा उद्देश मन शांत ठेवणे, नकारात्मक विचारांपासून मुक्त होणे आणि सकारात्मक ऊर्जेची निर्मिती करणे हा असतो. यासाठी विशिष्ट पद्धतीने श्वास घेणे, एखाद्या मंत्राचा जप करणे, किंवा एका जागी बसून मन स्थिर ठेवणे यासारख्या तंत्रांचा वापर होतो. ध्यानाचे मानसिक फायदे -१. तणाव कमी करणे: ध्यानामुळे शरीरातील कोर्टिसोल या तणावाशी संबंधित हार्मोनची पातळी कमी होते. यामुळे मन शांत राहते आणि मानसिक शांतीचा अनुभव येतो. २. चिंता दूर करणे: दररोज ध्यान केल्याने सतत चिंता वाटण्याची सवय कमी होते. हे मनाला स्थिर ठेवण्यास मदत करते. ३. स्मरणशक्ती सुधारते: ध्यान केल्याने मेंदूच्या काम करण्याच्या क्षमतेत सुधारणा होते, ज्यामुळे स्मरणशक्ती व निर्णयक्षमता वाढते. ४. डिप्रेशनवर उपाय: ध्यानामुळे नकारात्मक भावना कमी होऊन डिप्रेशनसारख्या गंभीर मानसिक समस्यांवर सकारात्मक परिणाम होतो.

ध्यानाचे शारीरिक फायदे

१. रक्तदाब नियंत्रित करणे: ध्यान नियमितपणे केल्याने रक्तदाब संतुलित राहतो, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. २. झोपेची गुणवत्ता सुधारते: ध्यानामुळे मन शांत होते, ज्यामुळे झोपेची गुणवत्ता वाढते आणि निद्रानाशाचा त्रास कमी होतो. ३. इम्यून सिस्टम मजबूत करणे: ध्यान केल्याने शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ४. शरीरातील ऊर्जा वाढते: ध्यानामुळे शरीर आणि मन या दोन्हींच्या उर्जेची पातळी वाढते, ज्यामुळे दिवसभर ताजेतवाने वाटते. ध्यान कसे करावे? १. योग्य जागेची निवड: ध्यान करण्यासाठी शांत आणि निवांत जागा निवडावी. २. सरळ बसण्याची स्थिती: जमिनीवर पाठीचा कणा सरळ ठेवून बसावे. ३. श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रित करणे: डोळे बंद करून श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रीत करा. ४. दररोज वेळ द्या: ध्यानासाठी दररोज १५-२० मिनिटे वेळ काढा. ध्यानाचा फायदा होण्यासाठी नियमितता आवश्यक आहे. सुरुवातीला काही मिनिटांसाठी ध्यान करा आणि नंतर हळूहळू कालावधी वाढवा. ध्यानाचे तंत्र शिकण्यासाठी अनुभवी मार्गदर्शकाची मदत घ्या. तणाव आणि चिंता यांसारख्या समस्यांवर ध्यान हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. हे मानसिक शांती देण्यासोबतच शारीरिक आरोग्यही सुधारते. रोजच्या धकाधकीच्या जीवनात थोडा वेळ काढून ध्यान करण्याची सवय लावल्यास जीवन अधिक आनंदी आणि सकारात्मक होऊ शकते. ध्यान ही मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी आजच्या काळातील आवश्यक गरज बनली आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



मला हळूहळू उमगलं की सहवास मला मनापासून आवडतो आहे. मासिक पाळीदरम्यान सहवासही मला आवडू लागला आहे. अनेकदा तर पाळीदरम्यान सहवमला फारच आनंददायी अनुभव वाटला.मासिक पाळीदरम्यान सहवास करावा की नाही यावर विविध स्तरातून संशोधन सुरू आहे.मला लक्षात आलं आहे की, असं वाटणारी मी एकटीच नाही. एका संशोधनानुसार, ५०० लोकांपैकी ५५ टक्के महिलांनी मासिक पाळीदरम्यान सहवास हा अनुभव अगदीच नैसर्गिक आणि अनोखा असल्याचं सांगितलं.

## २ Joke — विनोद




एक महिला : माझे पती वाघाप्रमाणे शूर, चित्त्याप्रमाणे चपळ आणि हत्तीप्रमाणे डौलात चालणारे आहेत.

दुसरी महिला : असं? त्यांना बघण्यासाठी किती रुपयाचं तिकीट काढावं लागेल?

## ३ Message — संदेश



1 bacha roj mandir se chapal churata tha,
ek din sare chapal bech ke 1 mobile kharida,
aaj wahi bacha apni story pad raha hai apni mobile pe.

## ४ Thought — सुविचार




संकटांना पाठ दाखविली की संकट पाठीशी लागतात. – स्वामी विवेकानंद

**संस्कृत सुभाषित**

**मरणस्य मुते! राज्ञो जराधवलचामरा।**
**यात्रा जगति निर्याति स्वाधिव्याधिपताकिनी ।।**

**अर्थ** : हे मुने, आधि व्याधींच्या उंच पताका आणि वार्धक्याच्या पांढऱ्या केसांच्या चवऱ्या ढळत आहेत. (आणि अशा तऱ्हेने) महाराज यमराजांची पालखी जगावर अविरत फिरत आहे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. प्रवासात उपयोगी
३. पाण्याचा साठा, तळे
७. बळजबरीचा मुक्काम
११. पाहून पाहून वाईटाचीही सवय होणे
१२. धातूचा नाजूक तंतू
१३. लाकडाची उत्कृष्ट जात
१४. समुदाय, गट
१६. एक नैसर्गिक शीतपेय
१७. थडगे
१८. मृत्यू नसलेला
१९. मान, प्रतिष्ठा, बूज
२०. सुकुमार
२१. चंदन उगाळण्याचा दगड
२४. मधली खोली
२६. गावातील देवाचा उरुस
२७. 'एनओसी' मराठीत
३१. पुढारी
३२. लढाई, चकमक
३३. जागृत, चकमक
३३. जागृत, स्थान
३५. हुशार, चलाख
३७. श्रेष्ठ पुरुष
३९. सुतळीचे कापड
४२. तिंबा!
४४. पुत्र, मुलगा
४६. फसविणे
४८. कान व डोळे ताठ करणे
५०. सैन्याचा मालपुरवठा
५२. वजा
५३. सरस्वतीचे एक नाव
५६. माराची खूण
५७. क्षण (हिंदी)
५८. ओलसर हवा
६०. पुन्हा पुन्हा
६३. ऱ्हस्व असल्यास व्याधी
६४. पुंकेसर
६५. मत्स्य
६७. बोलणे
६९. मुलगा
७०. टाळ्यांचा जोरदार आवाज
७१. अगम्य
७३. खटला
७५. स्तुती करणारा
७६. अस्वल
७७. जन्म, मृत्यू
७८. तटबंदी

### उभे शब्द

१. चाहता
२. यामुळे रामायण घडले
३. जन्मदात्री
४. नेहमी बुजणारा
५. बाण
६. मृत्यूनंतरचे मुक्कामाचे स्थान
७. ठाण्याचा रहिवासी
८. वाघाची मावशी
९. भीती, भय
१०. अजित नावाच्या भारतीय गोलंदाजाचे आडनाव
१३. सामोपचार
१५. भाताला दिलेला आकार
१८. धाकटा भाऊ
२०. हुक्की, लहर
२१. च्या बरोबर
२२. जय-पराजय
२३. कर्ज, उपकार
२४. फक्त, केवळ
२५. जाते फिरतानाचा आवाज
२६. जन्मापासून
२७. ख्रिसमस
२८. शिव्याशाप
२९. हत्तीचा शिक्षक
३०. वारा
३२. वर्ष
३४. थंडीने गार पडणे
३६. दारूचा एक प्रकार
३८. आवाज, गोंगाट
४०. रोखलेली नजर
४१. एक जंगली फूल
४३. वरपांगी
४५. सोसाट्याचा वारा
४७. अवाढव्य, भव्य
४९. उणे
५१. नवऱ्याची दुसरी पत्नी
५२. संयम सुटलेला, अधीर
५४. बरणीला लावण्याचे फडके
५५. विहीर, --नलिका
५७. मान्यतापत्र
५९. नंतर
६०. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
६१. थेट, सरळ
६२. धोबी
६५. हा जनात सांगावा, विरूद्ध असल्यास मनातच ठेवावा असे म्हणतात
६६. बडबड
६८. नोकरी
७१. शर्त, पण
७२. फोडातील द्रव
७४. डावा

### आडवे उत्तर

१.प्रवासी ३.जालशय ७.ठाण मांडणे ११.नजर मरणे १२.जर १३.साग १४.समूह १६.नीरा १७.कबर १८.अमर १९.कदर २०.सकवार २१.सहाण २४.माजघर २६.जत्रा २७.ना हरकत प्रमाणपत्र ३१.नेता ३२.संघर्ष ३३.जागा ३५.तरतरीत ३७.नरवर ३९.तरट फ ४२.मळा ४४.वस्त ४६.ठकविणे ४८.टवकारणे ५०.रसद ५२.उणे ५३.शारदा ५६.वळ ५७.पल ५८.दमट ६०.परत परत ६३.विकार ६४.पराग ६५.मासा ६७.वाचा ६९.तनय ७०.कडकडाट ७९.अनाकलनीय ७३.दावा ७५.भाट ७६.रीस ७७.जनन मरण ७८.कोट

### उभे उत्तर

१.प्रशंसक २.सीताहरण ३.जननी ४.लाजरा ५.शर ६.यमलोक ७.ठाणेकर ८.मांजर ९.डर १०.आगरकर १३.साम १५.मूद १८.अनुज २०.सणक २१.सह २२.हारजीत २३.ऋण २४.मात्र २५.घरघर २६.जन्मजात २७.नाताळ २८.तळतळात २९.माहूत ३०.पवन ३२.संवत्सर ३४.गारठणे ३६.रम ३८.रव ४०.टक ४१.कणेर ४३.वरवर ४५.वादळ ४७.विशाल ४९.वजा ५१.सवत ५२.उतावीळ ५४.दादरा ५५.कूप ५७.परवाना ५९.मग ६०.पसायदान ६१.तडक ६२.रजक ६५.मान ६६.वटवट ६८.चाकरी ७१.अट ७२.लस ७४.वाम



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पराभवानंतर खचला वैभव सूर्यवंशी! सांगितला गेम प्लॅन

मुंबई–टीम इंडियाचा १५ वर्षाचा वैभव सूर्यवंशी याला इंग्लंड दौऱ्यात काही खास कामगिरी करता आली नाही. वैभव सूर्यवंशीला मिळालेल्या तीन सामन्यात १३,१४ आणि १५ धावा करता आल्या. त्यामुळे टीम इंडियाला मालिका ४–० ने गमवावी लागली. अशातच भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात २३ जुलैपासून तीन सामन्यांची टी–ट्वेंटी आंतरराष्ट्रीय मालिका खेळली जाईल. हे तिन्ही सामने हरारे स्पोर्ट्स क्लबमध्ये खेळले जातील, अशातच वैभव सूर्यवंशीने सिरीजच्या आधी मोठं वक्तव्य केलं. बीसीसीआय.टीव्हीवर बोलताना वैभव सूर्यवंशीने मनातल्या भावना बोलून दाखवल्या. हरारेचे मैदान माझ्यासाठी खूप आठवणीत राहणारं आहे. इथं आम्ही चार महिन्यापूर्वी अंडर –१९ चा वर्ल्ड कप सामना खेळला होतो आणि जिंकलो होतो, असे वैभव सूर्यवंशी म्हणाला. टीम इंडियाचं प्रतिनिधित्व करणं प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. खूप चांगला क्षण आहे. एवढ्या चांगल्या ग्राऊंडवर पुन्हा चार महिन्यानंतर येणे अन् जिंकणं यात खूप वेगळी मजा असेल, असंही वैभव सूर्यवंशी म्हणाला आहे.
गेल्या चार महिन्यांत भरपूर चढ–उतार आले आहेत. पण क्रिकेटचा तो भाग आणि तोच भाग आम्ही पुढे चालू ठेवू. संघासाठी आमचे शंभर टक्के देऊ, असंही वैभव म्हणतो.

### कुलदीपने घेतला मोठा निर्णय; आता या देशासाठी खेळणार...

मुंबई–भारतीय फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने यॉर्कशायर काउंटी क्लबसोबत करार केला. तो या हंगामात संघासाठी आठ सामने खेळणार आहे. कुलदीप काही काळापासून भारतीय प्लेइंग इलेव्हनचा भाग नव्हता, पण आता तो काउंटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. तो पाच एकदिवसीय कप सामने आणि तीन रेड–बॉल सामने खेळेल.यॉर्कशायर क्लबने म्हटले आहे, मफ्यॉर्कशायर काउंटी क्रिकेट क्लबला भारतीय फिरकी गोलंदाज कुलदीप यादवला परदेशी क्रिकेटपटू म्हणून करारबद्ध केल्याची घोषणा करताना आनंद होत आहे. हा ३१ वर्षीय क्रिकेटपटू पाच एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी उपलब्ध असेल आणि त्यानंतर सप्टेंबरमध्ये होणाऱ्या चार काउंटी चॅम्पियनशिप सामन्यांपैकी शेवटच्या तीन सामन्यांसाठी हेडिंग्ले येथे परत येईल.फ्फ यॉर्कशायरमध्ये सामील झाल्यावर कुलदीप म्हणाला, मफ्मला यॉर्कशायरमध्ये सामील झाल्याचा आनंद आहे आणि या संधीबद्दल मी आभारी आहे. यॉर्कशायरसारख्या गौरवशाली इतिहास असलेल्या क्लबचे प्रतिनिधित्व करणे हा माझ्यासाठी खरा सन्मान असेल.फ्फ मला इंग्लंडमधील परिस्थितीत खेळण्याचे आव्हान नेहमीच आवडले आहे.

### मुंबईतर्फे ३० जुलै रोजी महिला कुस्तीसाठी निवड चाचण्यांचे आयोजन

मुंबई–भारत सरकारच्या युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या मभारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (एसएआय) मुंबई येथील मनॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्सफ(एनसीओई) द्वारे, ३० जुलै २०२६ रोजी मएसएआय श्री अटलबिहारी वाजपेयी नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्सफ, अकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे महिला कुस्तीसाठी निवड चाचण्या घेण्यात येणार आहेत.
राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा किंवा राष्ट्रीय मानांकन स्पर्धामध्ये ५व्या स्थानापर्यत पात्र ठरलेल्या, अथवा गेल्या दोन वर्षात मान्यताप्राप्त राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धामध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या महिला कुस्तीपटूंसाठी या चाचण्या खुल्या आहेत. ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ८:०० वाजता उपस्थिती नोंदवून (रिपोर्टिंगने) या चाचण्यांना सुरूवात होईल. पात्र खेळाडूंनी आपल्या पात्रतेचा पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे आणि प्रमाणपत्रांसह संबंधित ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

### आयसीसी एकदिवसीय रँकिंगमध्ये मोठा ट्विस्ट! रोहित-विराटला होणार फायदा ?

मुंबई–भारत आणि इंग्लंड यांच्यात झालेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषेदने बुधवारी २२ जुलै २०२६ रोजी एकदिवसीय फलंदाजांची ताजी क्रमवारी जाहीर केली आहे. यात न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल अव्वल स्थानावर आहे, मात्र नुकत्याच झालेल्या भारत–इंग्लंड मालिकेमुळे त्याचे अव्वल स्थान धोक्यात आले होते.या मालिकेपूर्वी शुभमन गिल क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर होता. त्याने इंग्लंडविरुद्ध झालेल्या मालिकेत तीन सामन्यांमध्ये १८८ धावा केल्या. मात्र, फक्त एक रेटिंग पॉइंटने त्याचे अव्वल स्थान हुकले आहे. गिलचे एकूण रेटिंग पॉइंट्स ८०१ आहेत, तर डॅरिल मिचेल ८०२ पॉइंट्ससह अव्वल स्थानावर आहे.या क्रमवारीत विराट तिसऱ्या स्थानावर आहे. त्याचे रेटिंग पॉइंट्स ७६७ आहेत, तर रोहित ७५८ रेटिंग पॉइंट्ससह चौथ्या स्थानावर आहे. तसेच इंग्लंडचा फलंदाज जो रूटने टॉप–१० मध्ये पुनरागमन केले आहे. भारताविरुद्धच्या तीनही सामन्यांत तो बाद झाला नाही. त्याने

# देशांतर्गत क्रिकेटमध्ये नो बॉल चेंडूचे नियम बदलले!

## भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून नवीन नियम जाहीर



मुंबई: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने देशांतर्गत क्रिकेटमधील अवैध–चेंडूच्या नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. अब गोलंदाजाने जाणीवपूर्वक अवैध–चेंडू किंवा धोकादायक पूर्ण–उंचीचा चेंडू टाकला, तर त्याच्यावर थेट संपूर्ण सामन्यासाठी बंदी घालण्यात येऊ शकते. यासोबतच सामना निश्चिती आणि संशयास्पद निकाल रोखण्यासाठी अंतिम टप्प्यात डाव घोषित करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. पुणे गुन्हेगारी: मित्रांशी गप्पा मारत उभा होता... तितक्यात मागून ७ जण आले अन् अवघ्या ३० सेकंदांत ३० वार; पुण्यातील कात्रज हादरले! आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेटची नियमावली ठरवणाऱ्या मेलबर्न क्रिकेट क्लबने यापूर्वी मंडळाला नियमांमध्ये काही बदल सुचवले होते. ते बदल आता स्वीकारण्यात आले आहेत. त्यानुसार हे नियम बदलण्यात आले असून, सर्व नवीन नियम राज्यातील सर्व क्रिकेट संघटनांकडे पाठवण्यात आले आहेत. नवीन नियमानुसार, जाणीवपूर्वक अवैध–चेंडू टाकल्याबद्दल निलंबित झालेल्या गोलंदाजाला आता संपूर्ण सामन्यात गोलंदाजी करता येणार नाही. मात्र, नियमावलीच्या ४१.८ अंतर्गत हा निर्णय घेण्याचा अधिकार मैदानातील पंचांचा आहे, असे मंडळाने जाहीर केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे. पुढच्या महिन्यापासून दुलीप चषकामध्ये हे सर्व नवीन नियम लागू केले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी: शरद पवार–मोदी भेटीमुळे तर्कवितर्कांना उधाण मुंबई: राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी संसदेतील पंतप्रधान कार्यालयात भेट घेतली. दिवसाच्या समाप्तीबाबत मंडळाचा महत्त्वाचा निर्णय मंडळाने आणखी एका नियमामध्ये मोठा बदल केला आहे. दिवसाच्या शेवटच्या षटकात जर फलंदाज बाद झाला, तर फलंदाजी संघाला ते षटक पूर्ण खेळावे लागेल. जुन्या नियमामुळे संघांना दिवसाच्या शेवटी नवीन फलंदाज मैदानात पाठवण्यापासून रोखले जात होते आणि फलंदाज शेवटच्या षटकात बाद झाल्यास तेथेच खेळ थांबवण्यात येत होता. मात्र आता, असे करता येणार नाही. लंडन: फुटबॉल जगतातून एक मोठी बातमी समोर आली आहे. २०२६ च्या विश्वचषक स्पर्धेत पंच म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणारे प्रसिद्ध इंग्लिश पंच अँथनी टेलर निवृत्त झाले आहेत. मंडळाने जाहीर केलेल्या नवीन नियमांनुसार, संघांना आता सामन्याच्या अंतिम टप्प्यात डाव घोषित किंवा डाव सोडून देता येणार नाही. पूर्वनियोजित किंवा संशयास्पद निकाल लावण्यासाठी या नियमाचा गैरवापर केला जात असल्याचे आणि हे खेळासाठी घातक असल्याचे मंडळाचे मत आहे. त्यामुळे नव्या हंगामापासून सामन्याच्या शेवटच्या डावात डाव घोषित करता येणार नाही. याबरोबरच एकदिवसीय सामन्यांमध्ये पाण्याच्या विश्रांतीदरम्यान मुख्य प्रशिक्षकांना मैदानात जाऊन खेळाडूंशी चर्चा करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्याचबरोबर यष्टिरक्षकांसाठी आता चेंडू टाकण्याच्या क्षणीच आपले हातमोजे यष्ट्यांच्या मागे असणे आवश्यक असेल. पूर्वी, गोलंदाजाने धाव घेण्यास सुरुवात केल्यापासूनच हातमोजे यष्ट्यांच्या मागे ठेवावे लागत होते. जुन्या नियमामुळे काही वेळा यष्टिरक्षकाचा चेंडू अवैध–चेंडू ठरवला जायचा किंवा यष्टीचीत



## इंग्लंड दौऱ्यानंतर विराट कोहली पत्नीसह प्रेमानंद महाराजांच्या चरणी

वृंदावन : भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेनंतर प्रेमानंद महाराजांची भेट घेतली. कोहली आज म्हणजेच बुधवार २२ जुलै रोजी पत्नी अनुष्का शर्मासोबत वृंदावनला पोहोचला, जिथे त्यांनी प्रेमानंद महाराजांची भेट घेतली. यापूर्वी आयपीएल २०२६ संपल्यानंतर कोहलीने प्रेमानंद महाराजांचे आशीर्वाद घेण्यासाठी त्यांची भेट घेतली होती. हे सर्वश्रुत आहे की त्या हंगामात आरसीबीने विजेतेपद पटकावले होते.
कोहली आणि अनुष्का राधा केली कुंज आश्रमात अनवाणी चालताना दिसले आणि त्यांच्या भेटीचे व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाले. ऑनलाइन फिरणाऱ्या अनेक व्हिडिओंमध्ये हे जोडपे कडेकोट सुरक्षेत आश्रमात पोहोचताना दिसत आहे. अनुष्का आणि विराट दोघांनीही चेहऱ्यावर मास्क लावून आपली ओळख लपवण्याचा प्रयत्न केला.
आश्रमातून निघताना विराट आणि अनुष्का हातात प्रसाद घेऊन चिखलाच्या रस्त्यावरून अनवाणी चालले.
टीम इंडियाचा माजी कर्णधार रोहित शर्माच्या निवृत्तीबाबत सध्या क्रिकेट वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहेत. इंग्लंडविरुद्ध दमदार शतक झळकावल्यानंतर अनुष्काने प्रेमानंद महाराजांच्या दर्शनासाठी साधा पांढरा सलवार–सूट परिधान केला होता, तर विराट टी–शर्ट आणि पँटमध्ये कॅज्युअल लूकमध्ये दिसत होता. प्रेमानंद महाराजांचे आशीर्वाद घेण्यापूर्वी, ते दोघे आश्रमाच्या परिसरात फिरताना दिसले. कोहली आणि अनुष्काचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान, वृंदावनमध्ये, (र्तीीपवर्रींप) लोकांनी त्यांना पाहताच कोहली आणि अनुष्काचे फोटो काढायला सुरुवात केली.

## रोहितने आपल्या खेळीतून टीकाकारांना चपराक



### शतकानंतर रवी शास्त्रींची रोखठोक प्रतिक्रिया

मुंबई–इंग्लंडविरुद्ध लॉर्ड्स कसोटीत रोहित शर्माने खेळलेल्या १३८ धावांच्या शानदार शतकी खेळीनंतर भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी त्याचे तोंडभरून कौतुक केले आहे. रोहितच्या बॅटने केवळ धावा केल्या नाहीत, तर त्याच्यावर टीका करणाऱ्यांना मैदानावरच सडेतोड उत्तर दिले, असे सांगताना रवी शास्त्री यांनी ही खेळी म्हणजे ''टीकाकारांच्या गालावर बॅटने लगावलेली सणसणीत चपराक'' असल्याचे म्हटले.गेल्या काही दिवसांपासून रोहित शर्माच्या फॉर्मवर आणि त्याच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. मात्र लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर त्याने संयमी आणि आक्रमक फलंदाजीचा उत्कृष्ट मिलाफ साधत १३८ धावांची दमदार खेळी केली आणि सर्व चर्चांना पूर्णविराम दिला.रवी शास्त्री म्हणाले की, ''मोठे खेळाडू टीकेला शब्दांनी नाही, तर आपल्या कामगिरीने उत्तर देतात. रोहितने नेमके तेच केले. दबावाखाली खेळून त्याने ज्या पद्धतीने शतक झळकावले, ते त्याच्या मानसिक ताकदीचे आणि अनुभवाचे द्योतक आहे.''
लॉर्ड्सची खेळपट्टी सुरुवातीला फलंदाजीसाठी आव्हानात्मक असतानाही रोहितने संयम राखत डावाची बांधणी केली. त्यानंतर योग्य वेळी आक्रमक भूमिका घेत इंग्लंडच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. त्याच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने भक्कम धावसंख्या उभारत सामन्यावर मजबूत पकड मिळवली.अलीकडच्या काळात रोहित शर्माच्या निवृत्तीबाबत आणि वनडे कारकिर्दीबाबत विविध तर्कवितर्क लावले जात होते. काही माजी खेळाडू आणि क्रिकेट विषकांनीही त्याच्या सातत्यावर प्रश्न उपस्थित केले होते. मात्र या खेळीने रोहितने पुन्हा एकदा आपण अजूनही मोठ्या सामन्यांचा 'बिग मॅच प्लेअर' असल्याचे सिद्ध केले.रवी शास्त्री यांनी भारतीय संघ व्यवस्थापनालाही अनुभवी खेळाडूंचे महत्त्व ओळखण्याचा सल्ला दिला. मोठ्या स्पर्धामध्ये अनुभव ही सर्वात मोठी ताकद असते आणि रोहितसारख्या खेळाडूंची उपस्थिती संघासाठी अमूल्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रोहित शर्माच्या या शतकी खेळीनंतर त्याच्या भवितव्यावरील चर्चा मागे पडल्या असून, सध्या सर्वत्र त्याच्या शानदार फलंदाजीचीच चर्चा रंगली आहे.

## भारत विरुद्ध सामन्याच्या २४ तास आधी झिम्बाब्वेने जाहीर केला संघ, या १५ खेळाडूंवर लावला दाव

मुंबई–भारत विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यात २३ जुलै पासून तीन सामन्यांची टी२० सीरिज खेळवली जाणार आहे. ही सीरिज सुरु होण्यासाठी अवघे २४ तास शिल्लक असताना झिम्बाब्वेने त्यांच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. झिम्बाब्वेने बांगलादेश विरुद्ध मागच्या सीरिजच्या तुलनेत यावेळी संघात काही महत्वाचे बदल केले आहेत. सिकंदर रजाच्या नेतृत्वात विकेटकिपर बॅटर तफादजवा त्सिगाला पहिल्यांदा टी२० संघात सामील व्हावे लागले. ऑलराऊंडर वेस्ली मधेवेरे याचं सुद्धा संघात पुनरागमन झालं आहे. वेगवान गोलंदाज न्यूमैन न्यामहूरी ज्याने झिम्बाब्वेसाठी टी२० मध्ये अद्याप पदार्पण केलं नाही तो आता दुखापतीतून बरा झाल्यानंतर पुनरागमन करत आहे. या दुखापतीच्या कारणामुळे तो बांगलादेश सीरिजमधून बाहेर पडला होता. न्याम्हुरीच्या जागी संघात आणलेल्या तनाका चिवांगाला आपले स्थान कायम ठेवण्यात यश आले आहे. हे तीन खेळाडू क्लाइव्ह मदंडे, टिनोटेंडा मापोसा आणि ताशिंगा मुसेकिवा यांची जागा घेतील.
भारत विरुद्ध झिम्बाब्वेचा संघ आयसीसी टी२० वर्ल्ड कप २०२६ च्या ग्रुप स्टेजमध्ये सामना खेळला होता. यात भारताने ७२ धावांनी विजय मिळवला. झिम्बाब्वे बांगलादेशच्या विरुद्ध २–१ ने पराभूत झाल्यावर भारताविरुद्ध सीरिज खेळण्यासाठी उतरली आहे. टीम इंडियाचा संघ मागच्या दोन टी२० सीरिजमध्ये पराभूत झाली आहे. आयसीसी पुरुष टी२० वर्ल्ड कप विजेता भारतीय संघाला आयर्लंड विरुद्ध २–० ने पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर इंग्लंड विरुद्ध सुद्धा त्यांना ४–० ने पराभव मिळाला.
भारत विरुद्ध झिम्बाब्वे टी २० सीरिज :
पहिला ऊ२०६: २३ जुलै , हरारे स्पोर्ट्स क्लब
दूसरा ऊ२०६: २५ जुलै , हरारे स्पोर्ट्स क्लब
तीसरा ऊ२०६: २६ जुलै, हरारे स्पोर्ट्स क्लब
झिम्बाब्वे टी२० संघ :
सिकंदर रजा (कर्णधार), ब्रायन बेनेट, रयान बर्ल, तनाका चिवांगा, बेन करन, ब्रॅड इवांस, वेस्ली मधेवेरे, तदिवानाशे मारुमनी, वेलिंगटन मसाकाद्जा, ब्लेसिंग मुजरबानी, डियोन मायर्स, रिचर्ड न्गारावा, न्यूमैन न्यामहूरी, मिल्टन शुम्बा और तफादजवा त्सिगा

## हेटमायर एकटा झुंजला, वेस्ट इंडिजचा न्यूझीलंडवर थरारक विजय!



मुंबई–शिमरन हेटमायरच्या झुंजार अर्धशतकीय खेळीमुळे वेस्ट इंडिजने ५ वनडे मॅचच्या सीरिजच्या शेवटच्या सामन्यात न्यूझीलंडवर २ विकेटने थरारक विजय मिळवला आहे. श्वास रोखून धरायला लावणाऱ्या या सामन्यात हेटमायर शेवटपर्यंत मैदानात राहिला. त्याने ६४ बॉलमध्ये नाबाद ६९ रनची खेळी केली. या सामन्यात न्यूझीलंडने पहिले बॅटिंग करताना ५० ओव्हरमध्ये ९ विकेट गमावून २६८ रन केल्या. या आव्हानाचा पाठलाग वेस्ट इंडिजने १५ बॉलआधीच ८ विकेट गमावून केला. आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या वेस्ट इंडिजने एकवेळ ९ रनमध्येच ३ विकेट गमावल्या होत्या. वेस्ट इंडिजचा स्कोअर ४४.४ ओव्हरमध्ये २४७८ होता. न्यूझीलंड विजयापासून फक्त २ विकेट दूर होती, पण हेटमायरने मात्र एकट्याने किल्ला लढवला आणि न्यूझीलंडच्या जबड्यातून विजय खेचून आणला.
शेवटच्या सामन्यामध्ये पराभव झाल्यानंतरही न्यूझीलंडने सीरिज ३–२ ने जिंकली आहे. पाचव्या आणि शेवटच्या वनडे सामन्यात पहिले बॅटिंग करताना न्यूझीलंडच्या टॉम लेथन, निक केली आणि विल यंग यांनी उत्कृष्ट खेळी केली. लॅथमने ७१ बॉलमध्ये ६९, निक केलीने ८० बॉलमध्ये ६४ आणि विल यंगने ६३ बॉलमध्ये ५६ रन केले. न्यूझीलंडने दिलेल्या २६९ रनच्या आव्हानाचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजने सावध सुरूवात केली, पण कुणालाही मोठा स्कोअर करता आला नाही, त्यामुळे मिडल ऑर्डरवर दबाव आला.

# दिग्गज गोलरक्षक गिलेर्मो ओचोआची २२ वर्षांच्या कारकिर्दीनंतर निवृत्ती!

मेक्सिको सिटी: फुटबॉल जगतातून एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. इतिहासातील सर्वोत्कृष्ट मेक्सिकन गोलरक्षकांपैकी एक मानल्या जाणाऱ्या फ्रान्सिस्को गिलेर्मो ओचोआ मागाना (र्त्रीळश्रश्रशीी जलहेर) याने मंगळवारी व्यावसायिक फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे. वयाच्या ४१ व्या वर्षी त्यांनी आपल्या तब्बल २२ वर्षांच्या गौरवशाली कारकिर्दीला पूर्णविराम दिला आहे.
दीर्घ आणि यशस्वी प्रवास: गेल्या आठवड्यात ४१ वर्षांचे झालेले ओचोआ २०२६ च्या विश्वचषकानंतर नवीन क्लबशी करार करणार असल्याची चर्चा होती, मात्र त्यांनी या सर्व अफवांना पूर्णविराम देत ग्लोव्हज बाजूला ठेवण्याचा निर्णय घेतला.
विक्रमी विश्वचषक सहभाग: ओचोआची तब्बल सहा विश्वचषकांसाठी मेक्सिकोच्या संघात निवड झाली होती. ही संस्मरणीय कामगिरी केवळ फुटबॉल जगतातील दिग्गज ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनेल मेस्सी यांच्या पंक्तीत बसणारी आहे. त्यांनी २०१४ (ब्राझील), २०१८ (रशिया) आणि २०२२ (कतार) या तीन विश्वचषकांमध्ये मेक्सिकोचे मुख्य गोलरक्षक म्हणून धुरा सांभाळली.
युरोपियन आणि क्लब कारकीर्द: फेब्रुवारी २००४ मध्ये क्लब अमेरिकाकडून अव्वल दर्जाच्या लीगमध्ये पदार्पण करणाऱ्या ओचोआने २०११ मध्ये फ्रेंच क्लब अजासिओमध्ये प्रवेश केला. युरोपमध्ये खेळणारे ते मेक्सिकोत जन्मलेले पहिले गोलकीपर ठरले. आपल्या कारकिर्दीत त्यांनी मालागा, ग्रानाडा, स्टँडर्ड लीज, सालेर्निताना, एव्हीएस फुटबॉल आणि एईएल लिमासोल यांसारख्या प्रसिद्ध युरोपियन क्लबचे प्रतिनिधित्व केले.
लंडन: फुटबॉल जगतातून एक मोठी



### मेक्सिकन फुटबॉलचा सुवर्णकाळ संपला;

बातमी समोर आली आहे. २०२६ च्या विश्वचषक स्पर्धेत पंच म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणारे प्रसिद्ध इंग्लिश रेफरी अँथनी टेलर ...
भावनिक निरोप:
निवृत्तीची घोषणा करताना ओचोआने सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या:
मी माझे सर्वस्व दिले; मी माझ्या क्लब आणि राष्ट्रीय संघासाठी मैदानावर सर्वस्व पणाला लावले, आणि आज मी माझे ग्लोव्हज बाजूला ठेवत आहे. एका स्वप्नामुळे मी किती दूर जाऊ शकेन याची मी कधी कल्पनाही केली नव्हती. आज मी अभिमानाने मागे वळून पाहू शकतो आणि म्हणू शकतो: धन्यवाद.
नुकत्याच संपलेल्या विश्वचषकात ते प्रामुख्याने राखीव खेळाडू म्हणून राहिले, तरीही व्यवस्थापक हावियर आगिरे यांनी मेक्सिकोच्या शेवटच्या गट–सामन्यात चेक प्रजासत्ताकविरुद्ध त्यांना शेवटच्या १३ मिनिटांसाठी मैदानात उतरवले. अंतिम शिट्टी वाजल्यानंतर भावूक झालेल्या ओचोआने एस्तादियो अझ्टेका स्टेडियमवरील गोलपोस्टचे चुंबन घेत आपल्या कारकिर्दीला अत्यंत भावनिक अलविदा केला.
मिळालेले किताब आणि यश:
क्लब यश: २००५ च्या क्लॉसुरा स्पर्धेत अमेरिका संघासह लीग विजेतेपद आणि स्टँडर्ड लीजसोबत बेल्जियन कप जिंकला.
आंतरराष्ट्रीय यश: मेक्सिकोला तब्बल सहा वेळा कॉनकाकॅफ गोल्ड कप (उेपलरलरष ेश्रव र्उीी) जिंकवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. तसेच, टोकियो २०२० ऑलिम्पिकमध्ये त्यांनी देशासाठी कांस्य पदक पटकावले.
मेक्सिकोच्या गोलपोस्टची भिंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिलेर्मो ओचोआ यांच्या निवृत्तीमुळे फुटबॉल जगतातील एका ऐतिहासिक पर्वाचा अंत झाला आहे.

# उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वातून 'विकसित महाराष्ट्र'च्या ध्येयाला बळ: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या सर्वसमावेशक विकासाच्या धोरणाला उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्वाची (CSR) प्रभावी साथ लाभत आहे. शासन आणि उद्योग क्षेत्राच्या भागीदारीतून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साध्य होत आहे. अशा उपक्रमांमुळे 'विकसित महाराष्ट्र २०४७' या राज्याच्या ध्येयाला बळ मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांना पूरक ठरणारे उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्वाचे उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवत आहेत. आरोग्य, पोषण, जलसुरक्षा, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि शालेय पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण काम करणारे उपक्रम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.

मोंडेलेज इंडियाच्या 'शुभ आरंभ' या प्रमुख सामाजिक उपक्रमांतर्गत गेल्या १३ वर्षांपासून पुणे जिल्ह्यातील मावळ आणि खेड तालुक्यातील ६० गावांमध्ये स्थानिक गरजांनुसार आरोग्य, पोषण, शिक्षण, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, क्रीडा आणि समुदाय विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे हजारो कुटुंबांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून आला असून, शासनाच्या विविध योजनांनाही प्रभावी पूरक बळ मिळाले आहे.

**आरोग्य सुविधांचे बळकटीकरण; लाखो नागरिकांना लाभ**

आरोग्य क्षेत्रात आयुष्मान भारत अभियानाशी सुसंगत पद्धतीने ५० हेल्थ अँड वेलनेस सेंटरचे आधुनिकीकरण व सक्षमीकरण करण्यात आले असून, त्याचा सुमारे ३.२ लाख नागरिकांना थेट लाभ झाला आहे. ॲनिमिया मुक्त भारत अभियानाअंतर्गत महिलांमध्ये आणि किशोरवयीन मुलींमध्ये रक्तक्षय ओळखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या माध्यमातून सुमारे ५ हजार उच्च जोखमीच्या गर्भवती महिलांची ओळख करून त्यांना विशेष उपचारासाठी संदर्भित करण्यात आले, तर एक हजारांहून अधिक पाच वर्षांखालील बालकांना प्रगत उपचारासाठी पाठविण्यात आले.

याशिवाय, २२६ आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन नवजात बालकांची घरपोच आरोग्य तपासणी, उच्च जोखमीच्या रुग्णांची ओळख आणि प्राथमिक आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यात आली. आरोग्य जनजागृतीसाठी विविध विशेष आरोग्य शिबिरे तसेच जागतिक आरोग्य, क्षयरोग, मातृत्व आणि योग दिन साजरा करण्यात आला.

**ग्रामीण क्रीडा विकासाला नवी दिशा**



'खेलो इंडिया' अभियानाशी सुसंगत 'शुभ आरंभ स्पोर्ट्स फॉर एक्सलन्स' या उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्याचे काम करण्यात आले आहे. फुटबॉल आणि कबड्डीसारख्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांना नियमित प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक, जीवनकौशल्य प्रशिक्षक आणि स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या दशकात सुमारे ९ हजार विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रशिक्षणाचा लाभ मिळाला असून, त्यामध्ये मुलींचा सहभाग जवळपास ५० टक्के आहे. परिसरात १० क्रीडांगणे विकसित करण्यात आली आहेत. शालेय स्तरापासून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्याचे कार्य सुरू आहे.

**शाळांमध्ये पायाभूत सुविधा आणि हरित ऊर्जा उपक्रम**

ग्रामीण भागातील शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. २७ आरओ पाणी शुद्धीकरण यंत्रणा, १२ स्वच्छतागृहे अनेक शाळांमध्ये संरक्षक भिंती, पेव्हिंग ब्लॉक आणि अन्य सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी ६० किलोवॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला असून, त्यामुळे ग्रामपंचायतीच्या वीज खर्चात दरवर्षी मोठी बचत होत आहे. तसेच विविध वाड्यांमध्ये सौर पथदिवे बसविण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेतही वाढ झाली आहे.

**जलसंधारणातून शेतीला दिलासा**

जलसंधारण क्षेत्रात सहा जलसाठा संरचनांची निर्मिती व दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे २,००० लाख लिटर अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. याचा लाभ ३०० एकरांहून अधिक शेती आणि ५०० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना झाला आहे. याशिवाय, पुढील दोन वर्षांत २० हून अधिक नवीन जलसंधारण प्रकल्प उभारून सुमारे २,५०० लाख लिटर भूजल पुनर्भरण क्षमता निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये शेततळी, बंधारे, बोअरवेल रिचार्ज आणि पर्जन्यजल संधारणासारख्या उपाययोजनांचा समावेश आहे.

**पोषण शिक्षणातून निरोगी पिढी घडविण्याचा प्रयत्न**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये सकस आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीची सवय निर्माण करण्यासाठी पुणे, सिंधुदुर्ग आणि मुंबई जिल्ह्यातील २३५ शाळांमध्ये पोषण शिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या माध्यमातून सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांपर्यंत सुरक्षित आणि सकस आहाराचा संदेश पोहोचविण्यात आला.

४७० शिक्षकांना 'हेल्थ अँड वेलनेस ॲम्बेसेडर' म्हणून प्रशिक्षित करण्यात आले असून, सर्व शाळांमध्ये 'सेहत क्लब' स्थापन करण्यात आले आहेत. अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि पोषणविषयक जनजागृतीसाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात आला आहे.

**पुढील दोन वर्षांसाठी व्यापक कृती आराखडा**

या उपक्रमाचा पुढील टप्पा अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, हेल्थ अँड वेलनेस सेंटरची गुणवत्ता वाढविणे, विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन, ग्रामीण क्रीडा विकासासाठी प्रगत प्रशिक्षण, तसेच जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणाच्या नव्या प्रकल्पांची अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

शासनाच्या विविध योजनांशी प्रभावी समन्वय साधत ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य, शिक्षण, जलसुरक्षा आणि जीवनमानात शाश्वत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राज्यासाठी आदर्श ठरत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात डेंग्यू प्रतिबंधात्मक जनजागृती कार्यक्रम संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** सार्वजनिक आरोग्य विभाग, लातूर शहर महानगरपालिका आणि आय.क्यू.ए.सी. विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सीईटी सभागृहामध्ये डेंग्यू प्रतिबंधात्मक जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी साथरोग तज्ञ डॉ.ऋषिकेश खरोळकर, पर्यवेक्षक डॉ.गुणवंत बिरादार, आरोग्य निरीक्षक पार्श्वनाथ पाटील, आरोग्य कर्मचारी केदार प्रदीप, आरोग्य कर्मचारी व आशाताई यांची उपस्थिती होती.

यावेळी साथरोग तज्ञ डॉ.ऋषिकेश खरोळकर यांनी पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना डेंग्यू आजाराची माहिती, कारणे, दुष्परिणाम आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याची उदाहरणासह उपयुक्त माहिती दिली.

विद्यार्थ्यांनी सुद्धा डेंग्यू आजाराविषयी उपस्थित मान्यवरांना विविध प्रश्न विचारून त्यांची उत्तरे जाणून घेतली. त्यानंतर लातूर शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयात सर्वे क्षण करून आवश्यक ठिकाणी त्याठिकाणी आर्बेटिंग केले.

हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी आणि आयक्यूएसी समन्वयक प्रो.डॉ.आनंद शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार पर्यवेक्षक डॉ.गुणवंत बिरादार यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नंदू काजापुरे, बालाजी डावकरे आणि के.आर.कोळी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## कै. निर्मला गंगाधर धानोरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सर्वनिदान आरोग्य

**जवळगा/प्रतिनिधी:** कै. निर्मला गंगाधर धानोरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त जवळगा येथे सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत सर्वनिदान आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा मा. उषाताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसवराज धाराशिवे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संभाजी पाटील तळेगावकर, धाराशिव जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील, गंगाधर धानोरे, माजी सरपंच प्राचार्य डॉ रामलिंग मुळे, राहुल धानोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात लातूर येथील विवेकानंद हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने विविध आजारांची तपासणी करून नागरिकांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. शिबिरास परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.

यावेळी माजी सरपंच प्राचार्य डॉ रामलिंग मुळे यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष सौ उषाताई पाटील, बसवराज धारशिवे यांची औसा विधानसभा मतदार शेत पाणंद रस्ते सह अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल , श्री आप्पासाहेब



पाटील यांची जिल्हा परिषद सदस्य धाराशिव वर निवडून आल्या बदल , श्री महादेव खिचडे सर यांचा रामलिंगेश्वर चा ज्ञानयात्री गौरव ग्रंथ शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.


कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धानोरे परिवार, आयोजक मंडळ तसेच उपस्थित मान्यवर आणि वैद्यकीय पथकाचे आभार व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमाचे संचलन ईश्वर बिरादार, तर आभार राहूल धानोरे यांनी मांडले.

## दयानंद कला महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वास वाढविणारी विशेष समुपदेशन कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी:** विद्यार्थ्यांनी स्वतः मधील गुण, दोष आणि कौशल्यांची जाणीव ठेवून सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारल्यास कोणत्याही आव्हानाला यशस्वीपणे सामोरे जाता येते. I'm OK, You're OK हा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेच्या मानसोपचारतज्ज्ञ व समुपदेशक श्रीमती वैशाली सेठ यांनी केले.

स्थानिक दयानंद कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष समुपदेशन व मार्गदर्शन कार्यशाळेत त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या पुढाकाराने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

आपल्या मार्गदर्शनात वैशाली सेठ यांनी दहावीनंतर अकरावीमध्ये प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर उभ्या राहणाऱ्या विविध आव्हानांवर सविस्तर प्रकाश टाकला.



वाढलेला अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षांची तयारी, भविष्यातील करिअरची चिंता, पौगंडावस्थेतील भावनिक बदल आणि त्यातून निर्माण होणारा तणाव यांचा सकारात्मक पद्धतीने सामना करण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी प्रभावी संवाद कौशल्य, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, परीक्षेची भीती कमी करण्यासाठी ध्यान व रिलॅक्सेशन तंत्राचा वापर, तसेच मानसिक आरोग्य जपण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. समुपदेशनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास, अभ्यासातील एकाग्रता सुधारण्यास आणि तणावमुक्त वातावरणात शिक्षण घेण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेस इयत्ता अकरावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी NSS विभागीय समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. दशरथ ननवरे, डॉ. सुधीर गाडवे आणि प्रा. महेश जंगापल्ले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महमदापूर श्रीराम विद्यालयाचे जवाहर नवोदय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी:** महमदापूर ता लातूर, येथील मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट लातूर द्वारा संचलित श्रीराम विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी श्रिया गोविंद आदावळे हिची पी.एम.श्री.जवाहर नवोदय विद्यालय चिंचोलीराव वाडी लातूर येथे इयत्ता नववी वर्गाच्या प्रवेशासाठी निवड झाली आहे.

तिच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख साहेब,संस्था सचिव आमदार अमित भैय्या देशमुख साहेब,संस्थेचे सर्व पदाधिकारी,प्रशासकीय अधिकारी प्रा .डॉ.अजय पाटील,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सरवदे व्ही.ए शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी व ग्रामस्थांनी अभिनंदन व कौतुक केले.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील ब्रिज कोर्सला उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी** : दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर येथील संगणकशास्त्र विभागामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ब्रिज कोर्स उपक्रमाची अंतिम परीक्षा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. नव्याने महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाची ओळख करून देणे, त्यांच्या मूलभूत ज्ञानाचा पाया भक्कम करणे तसेच नियमित अभ्यासक्रमासाठी सक्षम बनविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. दि.०६ जुलै ते १५ जुलै या दरम्यान ब्रीज कोर्स घेतला.



सदरील ब्रिज कोर्स अंतर्गत विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर फंडामेंटल्स, प्रोग्रामिंगची मूलतत्त्वे, इंटरनेट व डिजिटल साक्षरता, वेब टेक्नॉलॉजी, मायक्रोसॉफ्ट ऑफिस, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व डेटा सायन्स तसेच प्रोफेशनल स्किल्स या विषयांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन करण्यात आले.आज घेण्यात आलेल्या अंतिम परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित राहून परीक्षेत सहभाग नोंदविला.महाविद्यालय प्रशासनाच्या नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे परीक्षा शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात पार पडली.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.एस.एस.बेल्लाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.बी. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण उपक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यात आले.तसेच बी.सी.एस. अभ्यासक्रम समन्वयक डॉ.एस.ए.जाजू यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.ब्रिज कोर्स कार्यक्रम समन्वयक प्रा.डी.आर.धुमाळ व प्रा.आर.जी.चिलमे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे प्रभावी आयोजन करण्यात आले.

या ब्रिज कोर्समध्ये प्रा.डी.आर. दाडगे, प्रा.ए. एम. बोराडे, प्रा. व्ही. ए. पवार, प्रा. एस. एम. शिंदे, प्रा. एस. एस. पठाण, प्रा. पी. एल. घाटे, प्रा. ए. टी. बनाटे आणि प्रा. व्ही. एम. ताडमाडगे यांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी आवश्यक असलेले मूलभूत ज्ञान आत्मसात करण्यास मोठी मदत झाली. ब्रिज कोर्सच्या यशस्वी आयोजनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास, तांत्रिक व शैक्षणिक पाया अधिक भक्कम होण्यास तसेच नियमित अभ्यासक्रमाची सुरुवात अधिक आत्मविश्वासाने करण्यास या उपक्रमाचा निश्चितच लाभ होणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# शिष्यवृत्ती आडकली; महाविद्यालयांकडून विद्यार्थी वेठीस

धाराशिव (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागातर्फे शिष्यवृत्ती मंजुरीत झालेल्या उदासीन कारभाराचा फटका विद्यार्थ्यांना बसत आहे. मागील वर्षीची शिष्यवृत्ती अद्यापही मंजूर न झाल्याने अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयांनी अडवून धरले आहेत. शिक्षण फी भरल्याशिवाय प्रवेश नाही, अशी आडमुठी भूमिका शहरातील नामांकित महाविद्यालयांनी घेतल्याने अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागले आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती दिल्या जातात. यात अनुसूचित जाती व जमाती घटकातील विद्यार्थ्यांना केंद्र सरकारची शिष्यवृत्ती मिळते. काही वर्षांपासून ही योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. गेल्या वर्षी सादर केलेल्या अर्जांपैकी अनेक विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्ती जमा झालेली नाही. त्यात दुसरा गंभीर प्रकार म्हणजे अर्जाची सद्यस्थिती तपासायची म्हटली तरी तेही अशक्य झाले आहे.

सामाजिक न्याय विभागाने 'महाडीबीटी'चे नवीन पोर्टल यंदा तयार केले आहे. ते सध्या कामच करत नसल्याने विद्यार्थ्यांची गोची झाली आहे. गमतीची बाब म्हणजे गेल्या वर्षीच्या शिष्यवृत्तीचे काय झाले, हे महाविद्यालयांनाही माहिती नाही. त्यामुळे नवीन वर्षाचे प्रवेश घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांकडून ते बँक पासबुकची झेरॉक्स किंवा बँक स्टेटमेंट मागवत आहेत.

त्यात शिष्यवृत्ती जमा झाली नसल्याची खात्री करून लागलीच विद्यार्थ्यांकडे मागील वर्षीचे शैक्षणिक शुल्क भरा, नाही तर यंदा प्रवेश नाही, अशी भूमिका घेत आहेत. यामुळे या घटकांतील विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. एक तर चालू शैक्षणिक वर्षाचा अर्ज भरायचा आहे. त्यातच आता गेल्या वर्षीच्या शिष्यवृत्तीवरून अशी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्हाभरातील असे विद्यार्थी संकटात सापडले आहेत.

सामाजिक न्याय विभागाने यंदा महाडीबीटी २.० हे नवीन पोर्टल सुरू केले आहे. मात्र त्यावर मागील वर्षाचा डेटा उपलब्ध नसल्याने विद्यार्थी आणि महाविद्यालये दोघेही संभ्रमात आहेत.

परिणामी, मागील वर्षाची शिष्यवृत्ती जमा झाली नसल्याची खात्री करण्यासाठी महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून बँक पासबुक किंवा बँक स्टेटमेंट मागवत असून, 'मागील वर्षाचे शुल्क भरा, अन्यथा प्रवेश मिळणार नाही,' असा पवित्रा घेत आहेत.

# येडशीत १५ दिंड्यांचे जल्लोषात स्वागत; पाच हजारांहून अधिक वारकऱ्यांची सेवा



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येडशी येथे आषाढी एकादशी अवघ्या तीन दिवसांवर आल्याने प्रत्येक वारकऱ्याची पावले पंढरीच्या दिशेने पडू लागली आहेत. पांडुरंगाच्या दर्शनाची आस लागलेल्या या वारकऱ्यांसह सर्व दिंड्या विठ्ठलनामाचा जयघोष करीत पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत आहेत.

धाराशिव तालुक्यातील येडशीला संत वै. रामकृष्ण भाऊ, भगवान भाऊ, परमेश्वर महाराज तसेच मृदंगमहर्षी जालिंदर सखाराम सस्ते (बप्पा) यांच्या कार्यामुळे आणि प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीला वारकरी संप्रदायाचा समृद्ध धार्मिक वारसा लाभला आहे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राच्या सीमेवरील येडशी गावातून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या अनेक दिंड्या मार्गक्रमण करतात. यापैकी काही दिंड्या येडशीत मुक्काम करतात. त्यामुळे येडशीकरांनी मोठ्या उत्साहात १५ दिंड्यांचे स्वागत करून आतापर्यंत १५ दिंड्यांतील पाच हजारांहून अधिक वारकऱ्यांची सेवा केली आहे. दि. १६ जुलै रोजी कंधार तालुक्यातील श्री संत परमपूज्य ज्ञानोबा माऊली लोहा ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे येडशीत आगमन झाले. या दिंडीत सुमारे ३५० ते ४०० वारकरी सहभागी होते. त्यानंतर दि. १७ जुलै रोजी साधू महाराज कंधारकर यांची दिंडी येडशीत दाखल झाली. ५० वर्षांहून अधिक परंपरा लाभलेल्या साधू महाराज कंधारकर यांच्या दिंडीचे येडशी ग्रामपंचायत चौकातील हनुमान मंदिराजवळ आगमन होताच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले. त्यानंतर विठ्ठलनामाचा गजर करीत ही दिंडी बार्शीच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी दिंडीतील वारकऱ्यांसाठी शशिकांत देशमुख यांच्या वतीने भोजनाची व्यवस्था करण्यात आली. ही दिंडी येडशी-बार्शी-कुर्डूव ाडी मार्गे पंढरपूरकडे रवाना झाली. विठ्ठलाच्या जयघोषाने तसेच टाळ-मृदंगाच्या निनादाने संपूर्ण येडशी नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली.

घरोघरी जेवणासाठी बोलावण्याची परंपरा : पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी येडशी गावातून जाणाऱ्या दिंड्यांमध्ये नांदेड जिल्ह्यातील कंधार परिसरातील दिंड्यांचे प्रमाण अधिक आहे. यामध्ये साधू महाराज कंधारकर यांची दिंडी, लोहा ते पंढरपूर दिंडी, करुळा ते पंढरपूर, धाकटे पंढरपूर (कवठा) ते पंढरपूर तसेच हरनवाडी ते पंढरपूर अशा जवळपास १५ हून अधिक दिंड्या गेल्या ५० वर्षांपासून येडशी मार्गे जात आहेत. या दिंड्यांतील वारकऱ्यांना येडशीतील ग्रामस्थ प्रेमाने घरोघरी जेवणासाठी आमंत्रित करतात. तसेच अनेकजण सार्वजनिक व वैयक्तिक स्वरूपात महाप्रसादाच्या पंगती आयोजित करतात.


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472


# पेपरफुटीप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी



कळंब (प्रतिनिधी)- अखिल भारतीय छावा संघटना, कळंब शहराच्या वतीने NEET आणि TET परीक्षा पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमाराचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. यासंदर्भातील निवेदन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उपविभागीय अधिकारी, कळंब यांच्या मार्फत देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, भारत हा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यावर उभा असलेला देश असून, अनेक वर्षे परिश्रम करूनही परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याने विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत होत आहे. NEET व TET पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि मानसिक नुकसान झाले असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचा निषेध करत, शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे लोकशाहीला शोभणारे नसल्याचे संघटनेने नमूद केले आहे. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून संबंधितांवर कारवाई करावी, तसेच केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय छावा संघटनेचे अमर गायकवाड, प्रशांत कांबळे, शीतल होसेमल्ल, जितेश यादव, सचिन पराटे, अमोल कसबे, आदित्य यादव आणि प्रशांत भराटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# महावितरण, पीक विम्यासह पेपरफुटीच्या प्रश्नांवर शिवसेनेचा उमरग्यात चक्काजाम



उमरगा (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शिवसेनेच्या वतीने सोमवारी (दि. २०) उमरगा येथे आंदोलन करण्यात आले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे चौकात झालेल्या या आंदोलनात महावितरणच्या कारभारासह पीक विमा, नीट व टीईटी पेपरफुटी प्रकरण आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या प्रश्नावर आवाज उठविण्यात आला.

आमदार प्रवीण स्वामी यांनी महावितरणच्या कारभारावर टीका करत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होत असतानाही शेतकऱ्यांना दिवसा नियमित व योग्य दाबाने वीज मिळत नसल्याचे सांगितले. कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे विद्युत मोटारी जळणे, ट्रान्सफॉर्मर खराब होणे आणि पिकांचे नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

ग्रामीण भागातील वारंवारच्या इमर्जन्सी लोडशेडिंगमुळे जनजीवन विस्कळीत होत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम थांबवून इच्छुकांना जुने मीटर बसविण्याची मागणीही करण्यात आली. तसेच लोहारा तालुक्यातील तीन महसूल मंडळांना अद्याप पीक विम्याचा लाभ मिळालेला नसल्याने संबंधित मंडळांचा तातडीने विमा योजनेत समावेश करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक अशोक सांगवे, युवानेते डॉ. अजिंक्य पाटील, शेतकरी सेना जिल्हाप्रमुख विजयकुमार नागणे, तालुकाप्रमुख सुधाकर पाटील, युवासेना तालुकाप्रमुख अजित चौधरी, माजी सभापती रणधीर पवार यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पीक विम्यासाठी लढा सुरू ठेवण्याची भूमिका लोहारा तालुक्यातील तीन महसूल मंडळांना पीक विम्यापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप करत संबंधित शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याची भूमिका शिवसेनेने घेतली. संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी आंदोलनातून करण्यात आली.

महावितरणला दिला इशारा वीज हा जनतेचा मूलभूत हक्क आहे. शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिला. कमी दाबाचा वीजपुरवठा, लोडशेडिंग आणि स्मार्ट मीटरच्या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## समान व असमान निधी योजनांसाठी शासनमान्य ग्रंथालयांनी २९ जुलैपर्यंत प्रस्ताव सादर करा

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

धाराशिव,दि.२२ जुलै (जिमाका) भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनांद्वारे राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अर्थसहाय्य योजना ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत.सन २०२६-२७ या वर्षासाठी या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले असून,इच्छुक ग्रंथालयांनी २९ जुलै २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत,असे आवाहन करण्यात आले आहे.या योजनांसंदर्भातील नियम,अटी तसेच अर्जाचा नमुना ु.ीीश्रष.र्सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असून, इच्छुक ग्रंथालयांनी तेथून अर्जाचा नमुना प्राप्त करून आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावेत.

**समान निधी योजनेंतर्गत इमारत बांधकामासाठी २५ लाखांपर्यंत अर्थसहाय्य**

सन २०२६-२७ च्या समान निधी योजनेंतर्गत ग्रंथालयांच्या इमारत बांधकाम व विस्तारासाठी कमाल २५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. मात्र,या योजनेव्यतिरिक्त समान निधी योजनांतील इतर लाभ केंद्रीय स्तरावर दिले जात असल्यामुळे त्या योजनांसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करू नयेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**असमान निधी योजनांत विविध घटकांसाठी अर्थसहाय्य**

असमान निधी योजनेंतर्गत ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ,साधनसामग्री, फर्निचर तसेच इमारत बांधकाम व विस्तारासाठी अर्थसहाय्य दिले जाणार आहे.यामध्ये फर्निचर खरेदीसाठी ४ लाख रुपये,तर इमारत बांधकामासाठी (फक्त एकदाच) १० ते १५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे.

याशिवाय 'ज्ञान कोपरा' विकसित करण्यासाठी २.५० लाख रुपये, आधुनिकीकरणासाठी विशेष अर्थसहाय्य २ लाख रुपये,तसेच ५०, ६०, ७५, १००, १२५ व १५० वर्षांच्या महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रमांसाठी ६.२० लाख रुपये आणि इमारत विस्तारासाठी १० लाख रुपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे.

तसेच राष्ट्रस्तरीय चर्चासत्रे, कार्यशाळा,प्रशिक्षण वर्ग व जनजागृती कार्यक्रमांच्या आयोजनासाठी १.५० लाख, २.५० लाख व ३ लाख रुपये पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध असून, 'बालकोपरा' स्थापन करण्यासाठी कमाल ६.८० लाख रुपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे.चार प्रतींसह प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक ग्रंथालयांनी प्रतिष्ठानच्या ु.ीीश्रष.र्सीं.ळप या संकेतस्थळावरील माहितीचा अभ्यास करावा.आवश्यक असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.ग्रंथालयांनी वरीलपैकी कोणत्याही एका योजनेसाठी विहित मार्गाने,आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी किंवा हिंदी भाषेत चार प्रतींमध्ये प्रस्ताव संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे २९ जुलै २०२६ पर्यंत सादर करावेत.तसेच हे प्रस्ताव राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान,कोलकाता यांच्या ऑनलाइन प्रणालीद्वारेही सादर करणे आवश्यक असल्याचे ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य,नगर भवन,मुंबईचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी आवाहनातून स्पष्ट केले आहे.

# अवैध मद्य विरोधी कारवाई.

वाशी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे: अंतर्गत महादेव वय २५ वर्षे, रा. गोजवाडा ता. वाशी जि. धाराशिव हे दि २१.०७.२०२६ रोजी आपल्या राहत्या पत्र्याचे शेडसमोर अंदाजे २,२०० किंमतीची २१ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

ढोकी (प्रतिनिधी)-पोलीस ठाण अंतर्गत दुलाबाई वय ६५ वर्षे, रा. रुईढोकी ता. जि. धाराशिव हे दि २१.०७.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649